# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मौ.दिवाणमान व मौजे चुळणे (ता.वसई) येथील शासकीय जमिनीचा विकास करण्याबाबत**

**(१) २७०६ (२३-१२-२०१४). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.दिवाणमान व मौजे चुळणे (ता.वसई) येथील अंदाजे ३४५ हेक्टर शासकीय जमिन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ६ मार्च, २०११ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांना दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(२) असल्यास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी उक्त प्रस्तावासंबंधी कार्यवाही करणेबाबत दिनांक १० डिसेंबर, २०११ रोजी वा त्यासुमारास कळविले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्याप या प्रकरणी कोणतीच कार्यवाही न होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१२-२०१८) :** (१), (२) व (३) मौ. दिवाणमान व मौजे चुळणे (ता.वसई) येथील जमिनीवर वांद्रे-कुर्ला संकुलाच्या धर्तीवर आर्थिक केंद्राचे विकसन करता येणे शक्य नसल्याने व प्राधिकरण राबवित असलेल्या इतर अनुषंगिक प्रकल्पही राबविता येणे शक्य नसल्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सदर जमिनी हस्तांतरीत करण्यासाठी पाठविलेला प्रस्ताव रद्द करण्यासंदर्भात दिनांक ३० जुलै, २०१३ रोजीच्या पत्रान्वये शासनास विनंती करण्यात आली होती.

तथापि, वसई-विरार महानगरपालिका व तेथील लोकप्रतिनिधी यांच्या विनंतीच्या अनुषंगाने सदर जमिनीवर इतर काही विकास करता येईल किंवा कसे याची चाचपणी करण्यात येत आहे.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील विकासकांनी इमारतींमध्ये वाढीव बांधकाम केल्याबाबत**

**(२) ५४६४५ (२९-०८-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील विकासकांनी इमारतींमध्ये नियमबाह्य वाढीव बांधकाम केल्याने व बांधकाम पूर्णत्वाचा दाखला न घेतल्याने विकासकांवर एम.आर.टी.पी. अन्वये गुन्हे दाखल करण्याचे आदेश नगरविकास विभागाने महानगरपालिका आयुक्तांना दिल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती किती विकासकांवर एम.आर.टी.पी. ॲक्ट अन्वये कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१२-२०१८) :** (१) अशी बाब नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एमएमआरडीए आणि एमटीडीसी यांनी शासकीय देना बँकेत केलेली गुंतवणूक**

**(३) ६७२६९ (१६-०१-२०१७). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एमएमआरडीए आणि एमटीडीसी या शासकीय यंत्रणांनी देना बँकेत मुदत ठेवीमध्ये ठेवलेली एकूण ४७७ कोटी रूपयांची गुंतवणूक रक्कम तारण म्हणून वापरून त्याआधारे ११४ कोटी रूपये काढून घेण्याच्या केलेल्या गैरव्यवहाराप्रकरणी मुख्य सचिवांनी चौकशी करावी असे आदेश राष्ट्रीय ग्राहक आयोगाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी एमएमआरडीएने देना बँकेत १ वर्षासाठी ३५० कोटी रूपये गुंतविले होते तर एमटीडीसीने १२५ कोटी ८२ लाख रूपये माहे जानेवारी ते मार्च, २०१४ या कालावधीसाठी गुंतविलेले असतानाही आवश्यक ती दक्षता न घेतल्याने त्यांच्या गुंतवणूकीवर व्याज देण्यास देना बँकेने नकार दिला होता, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, राष्ट्रीय ग्राहक आयोगाने दिलेल्या आदेशानुसार शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने गुंतविलेले रु. ३५१.५० कोटी इतक्या ठेवींचे देना बँकेने परिपक्व नियत तारखेस व्याजासह नुतनीकरण केले आहे.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या मुळ रक्कम रु. ५२.३३ कोटी रकमेच्या एकूण ८ मुदत ठेवींची व्याजासहीत रु. ६६,७४,३२,६४३/- इतकी रक्कम दि. ०६.०५.२०१७ रोजी देना बँकेने महामंडळास परत केली आहे. तसेच, रु. ७३.४९ कोटी इतक्या रकमेच्या ठेवींचे प्रत्येक वर्षी नुतनीकरण केलेले आहे.

(३), (४) व (५) राष्ट्रीय ग्राहक आयोगाने दि. ०३.०६.२०१६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार सदर प्रकरणाशी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी करण्याबाबत दिनांक १९.०७.२०१६, १४.११.२०१७ व ०९.०८.२०१८ च्या पत्रान्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सुचना देण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या बाबतीत महामंडळाच्या स्तरावर चौकशी करण्यात आली असून त्याबाबतचा अहवाल पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागास सादर करण्यात आला आहे. सदर चौकशी अहवालाबाबत महामंडळाकडून काही मुद्यांबाबतची माहिती मागविण्यात आली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत उचित कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

---

## मौजे हेदुटणे (ता.पनवेल) या गावचा मुळ गावठाण क्षेत्र प्रारूप आराखडा अंतिम करताना गावठाण क्षेत्र म्हणून कायम करणेबाबत

**(४) ८६४४३ (१२-०८-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसुचित क्षेत्र प्रस्तावित भूवापर नकाशा सन २०१३-१४ मधील मौजे हेदुटणे (ता.पनवेल) या गावाचा मुळ गावठाण क्षेत्र प्रारूप आराखडा अंतिम करताना गावठाण क्षेत्र कायम करावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१७ मध्ये वा दरम्यान मा.मुख्यमंत्री, यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नैनाने प्रसिध्द केलेल्या प्रारूप आराखडयामध्ये ज्या गावांचा समावेश आहे त्या गावांचे गावठाण क्षेत्र पिवळया रंगाने दर्शविले असून हेदुटणे गावाचा गावठाण समावेश हरीत पट्यात दर्शविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हेदुटणे गाव गावठाणाचे क्षेत्र असूनही प्रारूप आराखडयामध्ये गावठाण क्षेत्र दर्शविण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गावाभोवती असलेल्या गावठाणातील ७० टक्के भागामध्ये जिल्हाधिकारी, रायगड यांच्या परवानगीने बांधकामे झाली असून गावठाण क्षेत्रातील मोकळी जागा गावातील रहिवाशांच्या गावठाण विस्तारासाठी न ठेवता ती प्रारूप आराखडयात दर्शविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून हेदुटणे गावातील गावठाण क्षेत्र कायम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१२-२०१८) :** (१) होय.
(२), (३) व (४) महसूली अभिलेखानुसार लोकवस्ती असलेल्या गावठाणाच्या २०० मी. त्रिज्येमध्ये येणारे क्षेत्र शहरी ग्राम क्षेत्र म्हणून दर्शविलेले आहे.हेदुटणे गांवठाण हे महसुली गांवठाण असले तरी महसुली अभिलेखानुसार लोकवस्ती नसलेले क्षेत्र असल्याने सिडकोने प्रारुप विकास योजनेत लोकवस्ती नसलेले असे क्षेत्र दर्शविलेले आहे व या गावठाणाच्या बाहेरील क्षेत्र कमी घनता विकास या वापर विभागात दर्शविण्यात आले आहे.
(५) प्रारुप विकास योजना सिडकोने शासनास दि. २२/९/२०१७ रोजी मंजूरी करीता सादर केली असून, सदर प्रारुप विकास योजनेवर संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत. प्रारुप विकास योजना मंजूर करताना मा.लोकप्रतिनीधी यांचे निवेदनावर उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कांदिवली (ता.बोरीवली, जि.मुंबई) येथील भूमापन क्र.१२८ अ/३३-अ-३ या जमिनीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याबाबत**

**(५) ८९४१९ (०४-०९-२०१७). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कांदिवली (ता.बोरीवली, जि.मुंबई) येथील भूमापन क्र.१२८ अ/३३-अ-३ या रेव फादर जोसेफ व पी परेरा व इतर यांच्या मालकी असलेल्या जमिनीवर ५० पात्र झोपडीधारकांना मे.कॉनवूड एजेन्सीचे मुखत्यार व विकासक यांच्यातर्फे माहे मार्च, २०१० मध्ये वा त्यादरम्यान पत्रके देऊन झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी जागा ताब्यात घेण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नियमानुसार सदरहू झोपडपट्टीच्या पुनर्वसनासाठी मे.कॉनवूड एजेन्सीचे मुखत्यार व विकासक यांच्यातर्फे शासनाला प्रस्ताव सादर करुन त्यास शासनाने मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (३०-११-२०१८) :** (१) प्रश्नामध्ये नमूद केलेल्या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील उपलब्ध अभिलेखानुसार कोणतीही योजना नसल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण (जि.ठाणे) गोल्डन पार्क परिसरातील मे.उषा पेपर मिल लि. आणि मे.व्हर्टेकस न्युट्रॉन को.प्रा.लि. यांच्या भुखंडावर १५ आरक्षणे असल्याबाबत**

**(६) ९०६०२ (२३-०८-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण पश्चिमेतील (जि.ठाणे) गोल्डन पार्क परिसरातील मे.उषा पेपर मिल लि.आणि मे.व्हर्टेकस न्युट्रॉन को.प्रा.लि.यांच्या भुखंडावर १५ आरक्षणे असल्याचे दिनांक २ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात शासनाने संबधित विभांगाना उक्त आरक्षणे हस्तांतरीत करणेबाबत बजाविले असतानासुध्दा कल्याण-डोंबिवली महानगरपालिका याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आरक्षणावरील उभी असलेली अनधिकृत बांधकामे तोडण्याबाबत नागरीकांच्या असंख्य तक्रारीनंतरही महानगरपालिका जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याने शासनस्तरावर याबाबत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-११-२०१८) :** (१) होय.

(२) उपरोक्त आरक्षणांपैकी आरक्षण क्र. ४७ प्राथमिक शाळा, आरक्षण क्र. ४१ महानगरपालिका कर्मचारी वसाहत व डी.पी. रस्ते ही आरक्षणे महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहेत. आ.क्र. ४५ ‘शॉपींग सेंटर’, आ.क्र. ४६ ‘वाचनालय’ व आ.क्र. ४८ ‘महिला कल्याण केंद्र’ ही आरक्षणे समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. उर्वरित आरक्षणे टप्याटप्याने ताब्यात घेण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडे सुरु आहे.

तसेच पोलिस आयुक्त या प्रयोजनासाठी आरक्षित असलेल्या जागेचा ताबा महानगरपालिकेने दि. १३/६/२०१६ रोजी घेतलेला असून, सदर जागा पोलिस विभागास हस्तांतरीत करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. आ.क्र. ४९ महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) साठी असून याबाबत मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. ७१९८/२००८ मध्ये दि. २०/११/२००८ रोजीच्या आदेशान्वये मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असल्याने सदर जागा म्हाडास हस्तांतरीत करता आलेली नाही.

(३) मंजूर विकास योजनेमधील आरक्षित असलेले भूखंड सद्यस्थितीत मोकळ्या स्वरुपामध्ये आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईच्या नविन विकास आराखडयात सीआरझेडने बाधित होणा-या इमारती वगळण्याबाबत**

**(७) ९५९५२ (०१-०१-२०१८). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या नविन विकास आराखडयात विक्रोळी (पूर्व) कन्नमवार नगर येथील सन १९६५-१९७० साली म्हाडाने बांधलेल्या वसाहतीमधील ५० व अधिक इमारती सीआरझेड व बफर झोनने बाधित झाल्याने या इमारतीमधील रहिवाशांना पुनर्विकासापासून वंचित रहावे लागत असून नविन विकास आराखडयात सीआरझेडने बाधित होणा-या इमारती वगळण्यासाठीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि स्थानिक रहिवाशांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कन्नमवार नगर येथील चुकीच्या पध्दतीने सीआरझेड/बफरझोन बाधित झालेल्या इमारतींचा पुनर्विकास होण्याच्या दृष्टिने उक्त इमारती सीआरझेड/बफर झोन मधून वगळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१२-२०१८) :** (१) ते (३) कन्नमवार नगर मधील म्हाडा अभिन्यास हा सागरी तट क्षेत्र (CRZ) व त्याच्या प्रतिबंधक पट्टयाने (Buffer Zone) बाधीत होत आहे. सागरी तट क्षेत्र व त्याच्या प्रतिबंधक पट्टयाची बाब ही राज्य शासनाच्या महाराष्ट्र सागरी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाशी संबंधित आहे. यासंदर्भात तयार करणेत आलेल्या सागरी क्षेत्र व्यवस्थापन आराखडयामधील तरतुदीप्रमाणे सीआरझेड क्षेत्राचे नियोजन विकास आराखडयामध्ये दर्शविलेले जाते. त्यमध्ये विकास आराखडयंच्या प्रक्रियमध्ये बदल करता येत नाही. सदर प्राधिकरणाने निश्चित केलेल्या सागरी तट क्षेत्र रेषा व प्रतिबंधक पट्टया (CRZ Line and Buffer Zone) नुसार व प्राधिकरणाने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राच्या (NOC) अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे विकास परवानगी देण्यात येते.

---

## मुंबईत तारांकित हॉटेल उभारणीसाठी किमान भुखंड क्षेत्राची अट शासनाने विकास नियंत्रण नियमावलीतून काढून टाकल्याबाबत

**(८) ९६१०४ (३०-१२-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत तारांकित हॉटेल उभारणीसाठी किमान भुखंड क्षेत्राची अट शासनाने विकास नियंत्रण नियमावलीतून काढून टाकल्याने बृहन्मुंबई क्षेत्रासाठी एकूण ३ चटईक्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेतील तारांकित हॉटेलच्या प्रस्तावास सदर अट लागू राहणार नाही असा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी मुंबईसह राज्यातील कोणकोणत्या महानगरपालिका, नगरपालिकांना लागू होणार आहे,

(३) असल्यास, पर्यटन घटकांच्या मेगा प्रोजेक्ट, अल्ट्रा मेगा प्रोजेक्ट, लार्च टुरिझम युनीट असे वर्गीकरण करुन त्यानुसार प्रोजेक्टला आर्थिक सवलतही देण्यात येणार असून सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१२-२०१८) :** (१) ते (३) महाराष्ट्र राज्यातील विविध पर्यटन क्षेत्रांचा विकास होण्याच्या दृष्टीने शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाने "महाराष्ट्राचे पर्यटन धोरण-२०१६" संबंधित शासन निर्णय दि.०४.०५.२०१६ रोजी निर्गमित केला आहे. सदर पर्यटन धोरणामध्ये प्रत्यक्षात रोजगार निर्मिती, भांडवली गुंतवणुकीचा कालावधी इत्यादीनुसार पर्यटन घटकांचे मेगा प्रोजेक्ट/ अल्ट्रा मेगा प्रोजेक्ट, लार्ज टुरीझम युनिट असे (Tourism Units) वर्गीकरण करण्यात आले असून वर्गीकरणानुसार त्यांना आर्थिक सवलती देण्यात आल्या आहेत. "महाराष्ट्राचे पर्यटन धोरण-२०१६" च्या अनुषंगाने प्रोत्साहन देण्यासाठी राज्य मंत्रीमंडळाचे दि.१९/०९/२०१७ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत विकास नियंत्रण नियमावलीमध्ये त्या अनुषंगाने सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीत सुधारणा करण्यासाठी फेरबदलाची सूचना दि.१३/१०/२०१७ रोजी निर्गमित करण्यात आली. तसेच महाराष्ट्रातील उर्वरित महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रासाठी विकास नियंत्रण नियमावलीत सुधारणा करण्यासाठी कलम ३७(१अेअे) अन्वये फेरबदलाची सूचना दि.३०/११/२०१७ रोजी निर्गमित केली आहे.

---

**मुंबईमधील विक्रोळी (पूर्व) स्थानकास समांतर असलेल्या**
**नामदेव पाटणे मार्गाच्या रुंदीकरणाबाबत**

**(९) ९६२३९ (०२-०१-२०१८). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमधील विक्रोळी (पूर्व) स्थानकास समांतर असलेला नामदेव पाटणे मार्ग हा अतिशय अरूंद असल्याने काही दुर्घटना घडल्यास अग्नीशमन दलाचे वाहन किंवा रूग्णवाहिकाही जाणार नाही तसेच नागरीकांना चालण्यासाठी अडचणी येत असून दिनांक २९ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास एल्फीस्टेन स्थानक येथे झालेल्या चेंगराचेंगरीची पुनरावृत्ती होवू नये म्हणून सदरच्या नामदेव पाटणे मार्गाचे रूंदीकरण करण्याची मागणी मागील अनेक वर्षांपासून स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीक करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नामदेव पाटणे मार्गाचे रूंदीकरण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१२-२०१८) :** (१) होय.

(२) वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी प्रश्नाधीन मार्गावरील अतिक्रमणे काढून टाकण्याची मागणी वाढत होती. त्यानुषंगाने सदर ठिकाणावरील अतिक्रमणधारकांना मध्य रेल्वेमार्फत नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. तथापि, सदर मार्गावरील अतिक्रमणधारकांनी मा. शहर दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला आहे. सद्यस्थितीत सदर बाब न्यायप्रविष्ठ असून मा. न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे मध्य रेल्वेच्या स्तरावर नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे दिवे-अंजूर (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे खाडी किनारी**
**अनधिकृतरित्या वाहनतळ उभारल्याबाबत**

**(१०) ९८६६७ (३०-१२-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हाइवे-दिवे (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे खाडी किनारी वाहनतळ कोणत्याही परवानग्या न घेता बांधण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिकांनी संबधित अधिका-यांकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वाहनतळावर लवकरात लवकर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-११-२०१८) :** (१) व (२) होय, दिवे-अंजूर ता.भिवंडी, जि.ठाणे येथील खाडी किनारी असलेल्या वाहनतळाबाबत प्राधिकरणास तक्रार अर्ज प्राप्त झाले आहेत.

(३) व (४) सदर प्रकरणी प्राप्त तक्रार अर्ज व दिनांक २५ जुलै, २०१५ रोजीच्या स्थळ पाहणी अहवालानुसार मौ. दिवे-अंजूर, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील स. नं. २१२ पै, २१३ पै व २१८ पै या जमिनीवरील बांधकामाबाबत विकासक श्री. विक्रम मोदी यांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमाच्या कलम ५३ (१) अन्वये दिनांक २६ जून, २०१६ रोजी नोटीस बजावण्यात आली आहे.

महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्रातील इतर अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यासाठी ७ दिवस अगोदर क्रमाक्रमाने पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक २ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या पत्रान्वये पोलिस विभागास कळविले आहे.

तथापि, सदर प्रकरणी दिनांक २९ जानेवारी, २०१८ रोजी दिवाणी न्यायालय, भिवंडी येथे दावा क्रमांक ५१/२०१८ हा दाखल झाला असून, त्यामध्ये मा. न्यायालयाने पुढील सुनावणीपर्यंत जैसे थे आदेश" पारित केले आहेत. सदर प्रकरणी दिनांक ३१ जानेवारी, २०१८ पासून आता पर्यंत ७ सुनावण्या लावण्यात झाल्या असून, त्या पुढे ढकलण्यात आल्या आहेत. आता दिनांक १२ नोव्हेंबर, २०१८ रोजी पुढील सुनावणी लावण्यात आली आहे. सदरहू प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने पुढील कार्यवाही स्थगित आहे. सदर प्रकरणी न्यायालयाच्या अंतिम आदेशानुसार कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

---

**मुंबई शहराचा नवीन आराखडा तयार करताना जुन्या चाळींच्या पुनर्विकासासाठी**
**एक स्वतंत्र नियमावली तयार करण्याचा घेण्यात आलेला निर्णय**

**(११) १००३६४ (०१-०१-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराचा नवीन आराखडा तयार करताना महानगरपालिका, जिल्हाधिकारी, राज्य शासन आणि अन्य यांच्या मालकीच्या जमिनीवर मोठ्या प्रमाणावर असलेल्या जुन्या चाळींच्या पुनर्विकासाबाबत एक स्वतंत्र नियमावली तयार करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, सदरहु नियमावली तयार करण्यास किती कालावधी अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१२-२०१८) :** (१) ते (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रारुप सुधारित विकास योजना-२०३४ ही विकास नियंत्रण नियमावलीसह तयार करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३० खाली शासनास मंजूरीसाठी सादर केलेली होती. शासनाने कलम ३१(१) नुसार दिनांक ८/५/२०१८ रोजीच्या अधिसूचनेन्वये विकास नियंत्रण नियमावलीस सारभूत स्वरुपाचे बदल (E.P.) वगळून मंजूरी दिलेली आहे. तसेच सारभूत स्वरुपाच्या बदलास (E.P.) दिनांक २१/०९/२०१८ रोजीच्या अधिसूचनेन्वये मंजूरी दिलेली आहे. सदर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये मुंबई शहरातील उपकर प्राप्त मिळकतींच्या पुनर्विकासासंबंधी तरतुद विनियम ३३(७) नुसार तसेच शहरातील उपकर प्राप्त नसलेल्या, उपनगरातील भाडेकरु व्याप्त जुन्या चाळींच्या पुनर्विकासासंबंधी तरतूद विनियम ३३(७)(अे) मध्ये करण्यात आली आहे. तसेच को.ऑप हाऊसिंग सोसायटींचे विद्यमान इमारतीचे पुनर्विकासासंबंधी तरतुद विनियम ३३(७)(बी) मध्ये करण्यात आली आहे.

---

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील सेंचुरी क्लब हाऊसजवळ रिजन्सी अंटालिया नामक संकुल उभारण्यात आल्याबाबत

**(१२) १०१२३८ (०३-०१-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील सेंचुरी क्लब हाऊसजवळ कल्याण मुरबाड रोडवर सीटीएस न.२७९ प्लॉट न.१ ते ६ (सर्व्हे न.४६, ४७, ४८, ५२, ५४, ५५, ५६, ५८, ५७, ५१, ५०, ४०, ४१, ४४, ४३, ४९) येथे प्राथमिक शाळा खेळाचे मैदान आणि ग्रीन झोन आरक्षणावर रिजन्सी अंटालिया नामक संकुल उभारण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्षात अनेक शासकीय परवानग्यांची विकासकाकडून पुर्तता करून न घेताच उल्हासनगर महानगरपालिकेने उक्त संकुलास बांधकाम परवानगी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी विकासक व महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१२-२०१८) :** (१) अशी वस्तुस्थिती नाही. विविध आरक्षणाखालील भूखंड वगळून रहिवास वापर विभागातील क्षेत्रावरील बांधकाम प्रस्ताव उल्हासनगर महानगरपालिकेने मंजूर केला आहे.
(२) अशी वस्तुस्थिती नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) मधील शहाड येथील ई.एम.टी.कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या निवास क्षेत्राचे आरक्षण असताना " कोणार्क रिजन्सी" नामक संकुल उभारल्याबाबत**

**(१३) १०१२३९ (०१-०१-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) मधील शहाड येथील ई.एम.टी.कंपनीचे आरक्षण असलेल्या नगर भूमापन क्र.१७०० व १७०१ येथे १४९५७.२५ मीटर जागेवर आणि उर्वरित जागेवर सदर कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या निवास क्षेत्राचे आरक्षण असताना "कोणार्क रिजन्सी" नामक संकुल उभारले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू ठिकाणी गृहसंकुल उभारण्याऱ्या विकासकाने एकूण १९ कोटीपेक्षा जास्त औद्योगिक जागेचे रहिवाशी क्षेत्रात बदल केल्याबाबतचे शुल्क (प्रीमियम) अदा केले नसल्याने बाकी असलेले शुल्क (प्रीमियम) तातडीने वसूल करून त्यांचेवर फौजदारी खटले भरावेत अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.नगरविकास राज्यमंत्री यांचेकडे दिनांक २ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त संकुल उभारतांना विकासकाने अनेक शासकीय परवानग्यांची पुर्तता न करता महानगरपालिकेने विकासकाला बांधकाम परवानगी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर औद्योगिक आरक्षणावर रहिवाशी क्षेत्र कोणत्या अटी व शर्तीनुसार उभारण्यात आले आहे,
(५) असल्यास, सदर प्रकरणी दोषींवर शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१२-२०१८) :** (१) ते (६) उल्हासनगर शहराच्या मूळ मजूर विकास योजनेनुसार संदर्भाधिन जमिन अंशत: रहिवास विभागात, बहुतांश भाग औदयोगिक विभाग व Existing hutment colonies to be improved या वापरासाठी नामनिर्देशित होती. सदर भूखंडामध्ये कोनार्क रिजन्सी नांव असलेल्या इमारतीस महानगरपालिकेने परवानगी दिलेली आहे. सदर परवानगी विवादास्पद असलेचे निदर्शनास आलेवरुन सहसंचालक नगर रचना, कोकण विभाग यांना सदर परवानगीची विकास नियंत्रण नियमावलीनुसार तपासणी करुन शासनास अहवाल सादर करणेस कळविले होते. त्यांनी शासनास अहवाल सादर केला असून,

त्याबाबत महानगरपालिकेचे म्हणणे मांडणेबाबत आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविले आहे. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांचे म्हणणे प्राप्त झालेनंतर शासनाकडून पुढील कार्यवाही संकल्पित आहे.

औदयोगिक वापर विभागाचे रहिवास वापर विभागात रुपांतरण करणेच्या अनुषंगाने अधिमुल्य भरणेबाबत उल्हासनगर महानगरपालिकेने विकासकास नोटीस बजावलेली असून त्या विरोधात विकासकाने मा.उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र.१५२०५/२०१७ दाखल केलेली असून, सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे.

---

**वरळी कोळीवाड्यातील गावठाण क्षेत्र अधोरेखित करून तातडीने सीमांकन करून या परिसराचा पुनर्विकास करण्याबाबत**

**(१४) १०५१०९ (१२-०४-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहराच्या प्रस्तावित विकास आराखड्यात वरळी कोळीवाड्यातील गावठाण क्षेत्र अधोरेखित करून संबधित विभागाकडून तातडीने सीमांकन करून या परिसराच्या पुनर्विकासासाठी सर्वमान्य होईल अशी विशेष योजना तातडीने तयार करण्याबाबतचे लेखी निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१७ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने वरळी कोळीवाड्यातील गावठाण क्षेत्र अधोरेखित करून तातडीने सीमांकन करून या परिसराचा पुनर्विकास करण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१२-२०१८) :** (१) ते (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रारुप विकास योजना- २०३४ जनतेकडून हरकती/ सूचना मागविण्यासाठी कलम २६ अन्वये दि. २७/०५/२०१६ रोजी प्रसिध्द केली होती. सदर प्रारुप विकास योजनेच्या अनुषंगाने महापालिकेस तसेच शासनास विविध सूचना / निवेदने प्राप्त झाली होती. सदर प्रारुप विकास योजनासंबंधी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमानुसार वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन शासन नगर विकास विभाग अधिसूचना दि.८/०५/२०१८ द्वारे बृहन्मुंबई विकास योजना -२०३४ सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ ला शासनाने मान्यता दिली असून सदर नियमावली दि. १/०९/२०१८ पासून अंमलात आली आहे. विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील सारभूत स्वरुपाचे फेरबदलास (EP) शासन अधिसूचना दि.२१/०९/२०१८ द्वारे मंजूरी दिली आहे

सदर नियमावलीतील विनियम ३३ (१६) मध्ये गावठाण/कोळीवाडा/आदिवासी पाडा क्षेत्राच्या पुनर्विकाससंबंधी तरतूद करण्यात आली आहे. गावठाण/कोळीवाडा/आदिवासी पाडा क्षेत्राच्या सीमा/हद्दी महसूल विभागाने निश्चित करावयाच्या असून महसूल विभागाने अशा हद्दी निश्चित केल्यानंतर सदर क्षेत्रासाठी स्वतंत्र विनियम करण्याचे संकल्पित आहे.

---

**नवी मुंबई क्षेत्रासाठी दोन नियोजन प्राधिकरणे अस्तित्वात असल्याबाबत**

**(१५) १०५११८ (१८-०४-२०१८). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईसाठी नवी मुंबई महानगरपालिका विकास नियोजन प्राधिकरण अस्तित्वात असतांना शासनाने नवी मुंबईच्या हद्दीत असणाऱ्या परंतु संपादित न झालेल्या जमिनीचे विकास नियंत्रक म्हणून सिडको प्राधिकरणाची नव्याने नियुक्ती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकाच शहरात दोन विकास प्राधिकरणे असल्यामुळे शहराचा विकास आराखडा राबविणे अशक्य होणार असल्याने सिडकोची विकास नियंत्रक प्राधिकरण म्हणून केलेली नियुक्ती रद्द करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीनुसार सिडको प्राधिकरणाची नियुक्ती रद्द करण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०१८) :** (१) शासनाने दिनांक ३१/१०/२०१७ च्या अधिसुचनेन्वये काही जमिनी सिडको महामंडळाच्या नवनगर क्षेत्रामधून वगळण्यात आल्या आहेत व या जमिनींकरीता सिडको ची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

(२) व (३) अशा स्वरुपाची बातमी दै.लोकसत्ता या वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती. तसेच याबाबत नवी मुंबई महानगरपालिकेकडून शासनास संदर्भ प्राप्त झाला आहे. या संदर्भात शासनाने वस्तुस्थितीदर्शक अहवाल व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांचेकडून मागविला आहे. सिडकोचा अहवाल प्राप्त झाल्यावर त्यावर उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे येथील घोडबंदर रोडवरील आनंदनगर ते ओवळा उड्डाणपुलाचे**
**काम त्वरीत करण्याबाबत**

**(१६) १०५१३९ (१८-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील घोडबंदर रोडवरील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाचा असलेल्या नियोजित आनंदनगर ते ओवळा उड्डाणपुलाचे काम त्वरीत मार्गी लावावे यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक बांधकाममंत्री यांचेकडे दिनांक ०५ जानेवारी, २०१८ रोजी तसेच वारंवार मागण्या केलेल्या अहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सादर केलेल्या निवेदनातील मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१२-२०१८) :** (१) सदर विषयाबाबत लोकप्रतिनिधी/स्थानिक लोकप्रतिनिधींकडून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे मागण्या प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे.
(२) व (३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्राप्त मागण्यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे:-

अ) आनंद नगर ते ओवळा उड्डाणपूल तातडीने बांधणे.

ब) कासारवडवली, ओवळा व भाईंदरपाडा या ठिकाणची उड्डाणपूले वेगवेगळी न करता, ती एकच करुन मेट्रो मार्गीका ४ या प्रकल्पाच्या कामांमध्ये उड्डाणपूलाचे काम करणे.

क) ठाणे म.न.पा. हद्दीतील प्रभाग क्र.१ मधील कासारवडवली सिग्नल येथे नागरिकांना रस्ता ओलांडून पलीकडे जाण्याकरिता व वाहनांच्या रहदारीसाठी ठाणे महानगरपालीकेमार्फत भूयारी मार्गाच्या (वाहनासाठी भूयारी मार्ग) बांधकामासाठी प्राधिकरणाने परवानगी देणे.

अ व ब मधील मागण्यांच्या अनुषंगाने रस्त्यावरील वाहनांच्या वाहतूकीसाठी उड्डाणपूल अथवा अन्य काय उपाययोजना करता येईल याबाबत सविस्तर अभ्यास करुन पुढील कार्यवाही करण्याचे प्राधिकरणाचे नियोजन आहे.

तसेच कासारवडवली येथे भूयारी मार्ग बांधण्यासंबंधी ठाणे महानगरपालिका, ठाणे यांच्याकडे सदर कामाच्या संबंधी सविस्तर माहिती व नकाशे उपलब्ध करुन व त्याचा अभ्यासकरुन त्याकरिता परवानगी देण्यासंदर्भात पुढील कार्यवाही प्राधिकरणाच्या स्तरावर सुरु आहे.

---

## ठाणे महानगरपालिका कशेळी काल्हेर गावांमधील सी.आर.झेड बाधित जमिनीवरील अनधिकृत बांधकाम निष्कसित करण्याबाबत

**(१७) १०५३५१ (१४-०४-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका (जि.ठाणे) कशेळी काल्हेर गावांमधील सी.आर.झेड बाधित जमीनीवर ९२ अनधिकृत बांधकामे झाली असून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने अनधिकृत बांधकामाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५३(१) अन्वये नोटीसा बजावल्या आहेत तथापि अनधिकृत बांधकामे अद्यापि निष्कासित करण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महसूल व वन विभागाने कांदवळनाची तोड व ऱ्हास थांबविण्यासाठी तसेच वेटलॅड/पाणथळ क्षेत्राचा नाश होऊ नये व प्राप्त होणा-या तक्रार अर्जाचे निराकरण करण्यासाठी भिवंडी तालुक्यासाठी तहसिलदार, भिवंडी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच किती तक्रार अर्जाचे निवारण करण्यात आले वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१८) :** (१) मौजे काल्हेर व कशेळी या गावांमधील सी.आर.झेड. बाधित क्षेत्रातील एकूण ९७ अनधिकृत बांधकामांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३ (१) अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. उक्त एकूण ९७ प्रकरणांपैकी ५ प्रकरणांमध्ये निष्कासनाची कार्यवाही करण्यात आलेली असून उर्वरीत ८५ प्रकरणांमध्ये पोलिस बंदोबस्त प्राप्त होण्याकरीता पत्र व्यवहार करण्यात आलेला असून पोलीस बंदोबस्त प्राप्त होताच निष्कासन कारवाई करण्याचे नियोजित आहे. उक्त प्रकरणांपैकी १० प्रकरणे न्याय प्रविष्ठ आहेत.
(२), (३) व (४) होय.

भिवंडी तालुक्यासाठी कांदळवन व वेटलॅड/पाणथळ क्षेत्राचा ऱ्हास होऊ नये व प्राप्त होणाऱ्या तक्रार अर्जावर निराकरण करणेसाठी कांदळवन सनियंत्रण समिती/ कांदळवन संरक्षण पथक तहसिलदार, भिवंडी यांचे अध्यक्षतेखाली गठीत केले असून सदर समितीने पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ चे कलम १५ व १९ अन्वये सन २००८ ते एप्रिल, २०१७ अखेर नारपोली पोलीस स्थानक - २६, तालुका पोलीस स्टेशन भिवंडी -३ व कोन गाव पोलीस स्थानक - १ असे एकूण ३० गुन्हे दाखल केले आहेत. मौजे दिवे (अंजूर) येथे खाजण जमीन असून सदर जागेवर मुंबई येथून डेब्रीज आणून टाकले जाते. त्यामुळे खाडीलगत असणारे कांदळवनाचे नुकसान होत आहे. सदर ठिकाणी सरासरी ३० फूट लांब व २० फूट रुंद जमिनीचे तळापर्यंत चार चर खोदण्यात आले असून रस्ता बंद करण्यात आलेला आहे. तसेच मौजे कशेळी व मौजे दिवे अंजूर येथील खाजण जमीनीच्या हद्दीलगत संरक्षण भिंत बांधल्याने सदर जागेवर डेब्रिजचा भराव करणाऱ्यांवर प्रतिबंध करणेत आला आहे व कांदळवनाचा ऱ्हास होणेस मज्जाव करण्यात आला आहे.

---

**कल्याण (जि.ठाणे) तालुका पंचायत समितीची इमारत बांधण्यासाठी आवश्यक असलेले चटई क्षेत्र निर्देशांकाच्या मागणीबाबत**

**(१८) १०६४४८ (११-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) तालुका पंचायत समितीची इमारत बांधण्यासाठी आवश्यक असलेले चटई क्षेत्र निर्देशांकाची मागणी दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास नगरविकास विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने कल्याण डोंबविली महानगरपालिका व सहा.संचालक नगर रचना, ठाणे यांच्याकडून या प्रकरणी अभिप्राय मागविले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इमारतींचे बांधकाम तातडीने हाती घेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) शासनाने दिनांक १४/३/२०१६ च्या शासन निर्णयान्वये शासनस्तरावरुन मंजूर करण्यात येणा-या अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांक मंजूरीचे अधिकार महापालिका आयुक्त यांना प्रदान केलेले आहेत. सबब, सदर प्रकरणी अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांकाकरीता आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचेकडे संपर्क साधावा, असे अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांना दिनांक १०/७/२०१८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाकडून मुंबई परिसरात बांधण्यात आलेल्या निवासी इमारतींमध्ये ५ हजार विस्थापीत कुटूंबीयांचे पुर्नवसन करण्याबाबत**

**(१९) १०७१०३ (१८-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाकडून मुंबई परिसरात बांधण्यात आलेल्या निवासी इमारतींमध्ये ५ हजार विस्थापीत कुटूंबीयांचे पुर्नवसन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारतींचे अनियोजीत व निष्कृष्ट दर्जाचे बांधकाम व त्या इमारतीचे देखभाल दुरुस्ती अदयाप करण्यात आली नसल्याने स्थानीक रहिवाश्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, इमारतींतील सदनिकाधारकांने विज व पाणी कनेक्शन देणे व देखभाल दुरुस्ती करण्यात यावी या संदर्भात स्थानिक रहिवाश्यांनी मा.गृहनिर्माण मंत्री मुख्याधिकारी, म्हाडा व प्राधिकरण यांच्याकडे दिनांक २५ डिसेंबर, २०१७ रोजी व त्यासुमारास वारंवार मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग २ व ३ च्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१२-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.

बृहन्मुंबई परिसरात बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली अंतर्गत व यासंबंधीच्या निकषांनुसार प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी विविध झोपडपट्टी पुनर्वसन योजनांतर्गत मुख्यत्वे खाजगी विकासकांच्या माध्यमातून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास ४८ पुनर्वसन वसाहतीमध्ये ६०० हून अधिक इमारतींमध्ये सुमारे ६४,००० सदनिका प्राप्त झाल्या आहेत. सद्यस्थितीमध्ये सुमारे ४५,००० निवासी/अनिवासी सदनिका प्रकल्पग्रस्तांना वितरीत करुन प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आले आहे.

(२), (३), (४) व (५) प्रस्तुत झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या नियोजन व विकासास संबंधित झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची मंजुरी असून प्राधिकरणाने पुनर्वसन केलेल्या इमारतींची विहित निकषांनुसार एकवेळची दुरुस्ती प्राधिकरणाद्वारे करण्यात येते. विज व पाणी कनेक्शन देणे व देखभाल दुरुस्ती करण्यासंदर्भात स्थानिक रहिवाश्यांकडून अधुनमधून मागणी होत असते.

ज्या वसाहतींमध्ये इमारतींच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांचे असोशिएशन नोंदणीकृत करण्यात येते तेथे पायाभूत सुविधांच्या श्रेणीवाढीची कामे करण्यात येतात. अशा दुरुस्त्यांमध्ये मुख्यत्वे वितरीत सदनिका राहण्यायोग्य करणे, पाणी गळती, उदवाहनांची दुरुस्ती, पाणी पुरवठा व मलनि:सारण व्यवस्था, रस्ते व पावसाळी पाण्याची निचरा व्यवस्था इत्यादीचा समावेश असतो.

---

## मुंबईतील जुन्या उपकरप्राप्त इमारती कोसळून झालेल्या दुर्घनेतील रहिवाशांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(२०) १०८५६० (०३-०४-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतल्या जुन्या इमारतींचा पुनर्विकास करताना मूळ रहिवाशांना पर्यायी जागा देणे, मुंबईतल्या सुमारे १४ हजार उपकरप्राप्त इमारती अजूनही पुनर्विकासाच्या प्रतिक्षेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुन्या उपकरप्राप्त इमारती कोसळून किती रहिवाशांना जीव गमवावा लागला आहे,

(३) असल्यास, जीव गमावलेल्या रहिवाशांच्या कुटुंबियांना शासनामार्फत आर्थिक मदत करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२०-११-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबई शहर बेटावर एकूण १९,६४२ उपकर प्राप्त इमारती होत्या. त्यापैकी काही इमारती कोसळल्या तर काही अत्यंत मोडकळीस आल्याने तोडल्या तर काहींची पुनर्बांधणी / पुनर्विकास झाल्याने, काही इमारती उपकरातुन वगळल्या आता सन २०१७ च्या पावसाळयापूर्व सर्वेक्षणानुसार प्रत्यक्ष अस्तित्वात असलेल्या उपकरप्राप्त इमारतींची संख्या १४,२८६ एवढी आहे. सदर इमारतींपैकी सुमारे ५५०० इमारतींची दुरुस्ती, भाडेकरु / रहिवाशी व मालक यांनी केलेली देखभाल तसेच काही इमारती आरसीसी, फ्रेमड् स्ट्रक्चरच्या असल्याने, त्या सुस्थितीत आहेत व उर्वरित सुमारे ९००० इमारतीची तातडीने पुर्नबांधणी/ पुर्नविकास करणे गरजेचे आहे.
(२) उपकरप्राप्त इमारतीतील दाट लोकवस्ती, अवजड सामान, निवासी गाळयांचा अनिवासी स्वरुपात होणारा वापर, त्यातुन ठेवण्यात आलेली यंत्रसामुग्री, रहिवाशांनी केलेली पोटमाळयाची बांधकामे, इतर स्वरुपातील अनधिकृत बांधकामे, इमारतीच्या देखभालीकडे मालक/ रहिवाशांनी केलेले दुर्लक्ष, इमारतीच्या आजुबाजूस साचणारे सांडपाणी इत्यादी कारणांमुळे इमारती संरचनात्मकदृष्टया क्षीण झाल्याने अंतत: कोसळल्या असाव्यात, असे मागील काही घटनांवरुन निदर्शनास आले आहे. या घटनांचे प्रमाण मुख्यत्वे पावसाळयात अधिक असते.

सन १९७०-७१ ते सन २०१६-१७ या मागील ४७ वर्षात जुन्या उपकर प्राप्त इमारती कोसळून जवळपास ७७७ व्यक्ती मृत्युमुखी पडल्याचे दिसून येते.
(३) जीव गमावलेल्या रहिवाशांच्या कुटुंबियांना जिल्हाधिकारी, मुंबई शहर या कार्यालयामार्फत आर्थिक मदत शासनाच्यावतीने केली जाते. तसेच म्हाडा प्राधिकरणाने क्र.६६५७, दि.०८.०५.२०१४ अन्वये पारित केलेल्या ठरावानुसार आर्थिक मदत देण्याचे प्राधिकरणाचे धोरण आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे-म्हारळ (ता.उल्हासनगर, जि.ठाणे) येथील सर्वे नं.५८ मधील ८००० चौ.मी. चा भूखंडावर E.P.१३४ नुसार कब्रस्तानचे आरक्षण कायम ठेवण्याबाबत**

**(२१) १०८९३८ (११-०४-२०१८). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे-म्हारळ (ता.उल्हासनगर, जि.ठाणे) येथील सर्वे नं.५८ मधील ८००० चौ.मी. चा भूखंडावर E.P.१३४ नुसार कब्रस्तानचे आरक्षण असून त्याचा टी.डी.आर.देण्यात येऊन सदरहू भूखंड उल्हासनगर महानगरपालिकेच्या नावे आरक्षित आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, कब्रस्तानाकरिता आरक्षित असलेला उपरोक्त भूखंड आरक्षणातून वगळण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू मौजे-म्हारळ येथील कब्रस्तानाकरिता आरक्षित असलेला भूखंड नवीन विकास योजनेत (E.P.१३४) कायम ठेवण्यात यावा अशी मागणी दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास आणि तत्पूर्वी वारंवार शासनाकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१२-२०१८) :** (१) उल्हासनगर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३० अन्वये शासनास मंजूरीकरीता सादर केलेल्या प्रारुप सुधारित विकास योजनेमध्ये स.नं. ५८ पै च्या ८००० चौ.मी. क्षेत्रावर कब्रस्तानचे आरक्षण प्रस्तावित केले होते. सदरची जमीन महानगरपालिकेकडे दिनांक २९/१/२०१६ रोजीच्या अधिसुचनेमधील तरतूदीनुसार अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशाक विकासकास देऊन हस्तांतरीत झाली आहे.
(२) उल्हासनगर शहराची प्रारुप सुधारित विकास योजना शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ मधील तरतुदीनुसार दि. २१/४/२०१७ च्या अधिसूचनेन्वये भागश: मंजूर केली असून, सारभूत स्वरुपाच्या बदलांवर दि. २१/४/२०१७ रोजीच्या सूचनेन्वये आम जनतेकडून सूचना/हरकती मागविण्यात आल्या आहेत. या सारभूत स्वरुपाच्या बदलांमध्ये मौ. म्हारळ येथील स.नं. ५८ (पै) च्या जमिनीवर कब्रस्तानचे आरक्षण वगळण्याचे व असे वगळण्यात येणारे क्षेत्र पब्लीक युटीलिटी करीता दर्शविण्याचे प्रस्तावित आहे. सदरचा बदल शासनाने ई.पी.-१३४ अन्वये प्रसिध्द केला आहे.
(३) होय.
(४) उल्हासनगर शहराच्या वगळलेल्या भागाच्या विकास योजनेवर नियुक्त अधिकारी तथा सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांचा अहवाल प्राप्त झाला असून त्यावर संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय प्राप्त झाले आहेत. सदर वगळलेल्या भागाच्या विकास योजनेवर निर्णय घेताना सदर ई.पी.-१३४ वर गुणवत्तेवर निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबत**

**(२२) १०८९९९ (१९-०४-२०१८). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील अनधिकृत बांधकामे प्रशमन फी व विकास आकार शुल्क आकारून प्रकरणे नियमाधीन करण्यासाठी शासनाने २००६ मध्ये निर्णय घेऊन जिल्हाधिकारी ठाणे, यांचे अध्यक्षतेखाली तज्ञ समितीची स्थापन केली असुन सदर समितीकडे २२०१३ मिळकत धारकांनी प्रस्ताव सादर केले त्यापैकी फक्त ९७ प्रकरणात प्रस्ताव धारकांना 'डी फार्म (अंतिम प्रमाणपत्र) दिलेले आहे. म्हणजे फक्त ०.४४% इतकीच अधिकृत बांधकाम प्रकरणे गेल्या ११ वर्षात निकाली काढण्यात आलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशमन फी आकार लाऊन अनधिकृत बांधकामे "प्रशमित संरचना "म्हणून घोषीत करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ रोजी शासन निर्णयाद्वारे प्रसिद्ध केलेल्या नियमाच्या आधारे उर्वरीत अनधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबत काहीही कार्यवाही उल्हासनगर महानगरपालिकेने केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनधिकृत बांधकामे नियमित करण्याच्या संथ कार्यवाहीमुळे स्थानिक प्रशासनाचे कोट्यवधीचे नुकसान झाले असून जनतेस नाहक त्रास झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार महत्वाच्या प्रकरणी मोठ्या प्रमाणावर धिम्या गतीने काम करण्यास जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई शासनाने केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०१८) :** (१) होय.

(२) अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून प्रशमित संरचना म्हणून घोषित करण्यासंदर्भात शासनाने दिनांक ७/१०/२०१७ रोजीच्या निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार कार्यवाही सुरु करण्यात येत असल्याचे आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) व (४) उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकास कामे नियमाधिन करणे अधिनियम, २००६ अंतर्गत प्राप्त विकास कामे ही राष्ट्रीय भवन संहिता व भारतीय मानक निर्देशानुसार सुस्थितीत असल्याचे तसेच बांधकामाच्या स्थैर्यतेबाबतचे प्रमाणपत्र व अग्निशमन सुरक्षा उपाय योजनांबाबत आवश्यक ते प्रमाणपत्र संबंधितांकडून प्राप्त करुन घ्यावे लागते. त्या अनुषंगाने तज्ञ समितीमार्फत प्रस्तावित प्रस्तावांमध्ये त्रुटीपत्रके निर्गमित केलेली आहेत. परंतू बांधकामाच्या भक्कमपणाबाबत व अग्निशमन सुरक्षा उपाय याबाबत बहुतांशी इमारत धारकांकडून आवश्यक ते प्रमाणपत्र प्राप्त होत नाहीत, असे निदर्शनास आले आहे.

उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकास कामे नियमाधिन करणे अधिनियम-२००६ मधील कलम ३(५) मधीत तरतुदीनुसार उल्हासनगर शहराच्या वेगवेगळया भागासाठी वेगवेगळी पदनिर्देशित प्राधिकारी नियुक्त करणेची तरतूद आहे. त्या अनुषंगाने महानगरपालिकेने शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला असून, सदर बाब पडताळण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) शहराच्या विकास आराखडयाला विरोध होत असल्याबाबत**

**(२३) ११०१६९ (११-०४-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) शहराच्या विकास आराखडयाला विरोध होत असून माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान शहरात अनेक ठिकाणी आंदोलने करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विकास आराखडयास विरोध करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या विकास आराखडयातील कोणत्या बाबींचा विरोध करण्यात आला आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१२-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) मंजूर विकास योजनेमध्ये दर्शविण्यात आलेले १२० रिंग रोड, निवासी क्षेत्रावर दर्शविण्यात आलेले आरक्षण, सन १९७४ च्या मंजूर विकास योजनेमध्ये जे क्षेत्र खेळाचे मैदान व हरीत विभागात ते सुधारीत विकास योजनेमध्ये रहिवास विभागात दर्शविले. नवीन प्रस्तावित रोडची अधिकची दर्शविण्यात आलेली रुंदी, तसेच झोपडपटटी असलेली जागा हरीत विभागात दर्शविणे इत्यादी विरोधाचे मुददे आहेत.

(४) विकास योजना मंजूरीच्या प्रक्रियेमध्ये नागरिकांचा सुचना /हरकती मागवून त्यांना सुनावणीची संधी दिली जाते. नियोजनाचे अनुषंगाने टप्पेनिहाय छाननी होऊन गुणवत्तेनुसार शासनाकडून विकास योजनेस अंतिम मंजूरी प्रदान केली जाते.

मंजूर विकास योजनेमधील नियोजन प्रस्तावामध्ये नियोजन प्राधिकरणास फेरबदल अपेक्षित असल्यास नियोजन प्राधिकरण महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ खाली वैधानिक कार्यवाही अनुसरुन शासनास मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करु शकेल. अशा प्रस्तावावर शासन गुणवत्तेनुसार अंतिम निर्णय घेवू शकते. सबब, नियोजन प्राधिकरणाकडून कार्यवाही अभिप्रेत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई, विरार, नालासोपारा आणि नायगाव या चार शहरांना जोडणाऱ्या रिंगरुट प्रकल्पाबाबत**

**(२४) ११०३९६ (११-०४-२०१८). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई, विरार, नालासोपारा आणि नायगाव या चार शहरांना जोडणारा रिंगरुट प्रकल्पाच्या कामाचे अंदाजित खर्च रुपये ११२६.०० कोटी रुपयांच्या जवळ असून सदरहु कामांचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या प्रस्तावित कामाच्या यादीत समावेश असून रस्त्याच्या कामास प्रत्यक्षात केव्हा सुरुवात होणार आहे व किती कालावधीत सदरहु काम पुर्ण होण्याची शक्यता आहे,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकल्पाच्या कामाची सद्यस्थिती काय आहे ?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-११-२०१८) :** (१), (२) व (३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबई महानगर प्रदेशात विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत विविध पायाभूत सुविधांची कामे केली जातात.

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात वसई, नालासोपारा व नायगांव या शहरांना जोडणारा पूर्व व पश्चिम अशा रिंग रोडचे प्राथमिक सर्वेक्षण अंदाजपत्रक (सविस्तर प्रकल्प अहवाल) वसई-विरार शहर महानगरपालिकेने तयार करुन प्राधिकरणाकडे दिनांक २ मार्च, २०१५ रोजी सादर केला आहे.

सदर प्रकल्पाची अंदाजित रक्कम पुर्वेकडील व पश्चिमेकडील समांतर रस्ता व जोडपूल इत्यादीची रुपये २६१४.०० कोटी इतकी असून, हा खर्च भागविण्याची महानगरपालिकेची क्षमता नसल्याने प्रकल्प प्राधिकरणाच्या माध्यमातून करण्याबाबतची विनंती वसई-विरार महानगरपालिका व स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली. सदर प्रकल्पापैकी पश्चिम बाजूस असणाऱ्या नायगाव, वसई, विरार, नालासोपारा या शहरांना जोडणाऱ्या अंदाजित रु.११२६.०० कोटी खर्चाचे असून सदर प्रकल्पाचा प्रस्ताव मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर मान्यतेसाठी तपासण्यात येत आहे.

---

## विलेपार्ले (मुंबई) येथील मालविया रोडवरील भूखंड क्रमांक ११२ महानगरपालिकेने उद्यानासाठी राखीव ठेवला असल्याबाबत

**(२५) ११०४३७ (१९-०४-२०१८). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विलेपार्ले (मुंबई) येथील मालविया रोडवरील भूखंड क्रमांक ११२ हा भूखंड महानगरपालिकेने उद्यानासाठी राखीव ठेवला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३ मध्ये सदर भूखंडाचा ताबा तत्कालीन स्थानिक नगरसेवक व अधिकाऱ्यांनी घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १ मे, २०१७ मध्ये सदर भूखंडाचा अर्धा भाग विकलांग मुलांसाठी व अर्धा भाग मुलींसाठी विकसित करण्यात येवून खुला करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भूखंडाचा मालकी हक्क न्यायालयीन असल्याने माहे जुलै, २०१७ मध्ये सदरचे उद्यान उदध्वस्त करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, भूखंडावर मालकी न्यायालयीन असताना उद्यान समितीने ५० लाख रुपयांची तरतूद करुन ती खर्च देखील केली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही. बृहन्मुंबई महानगरपालिका अधिकाऱ्यांनी मैदानाचा ताबा घेतला होता.

(३) हे खरे नाही. तथापि वस्तुस्थिती खालीलप्रमाणे विलेपार्ले (पूर्व) येथे न.भू.क्र. १०२५, अंतिम भूखंड क्र. ११२ हा उद्यानाकरीता राखीव असून २०१३ साली सहाय्यक अभियंता (परिरक्षण) यांच्याकडे महानगरपालिका विकास व नियोजन व मालमत्ता खाते यांच्यामार्फत ताब्यात देण्यात आला होता. सदर भूखंडावर उद्यान कक्षामार्फत विकासाचे काम चालू असताना मा. उच्च न्यायालयात याचिका क्रमांक ४३८/२०११ अन्वये नाईस शेल्टर यांच्या तक्रारीस सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाचे दिनांक ११ फेब्रुवारी २०१६ रोजीचे "जैसे थे" (Statesquo) चे आदेश प्राप्त झाल्याने सदर काम बंद करण्यात आले. मा.न्यायालयाच्या आदेशान्वये सदर उद्यान नागरीकांसाठी बंद आहे.

(४) हे खरे नाही.

(५) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर भूखंडावर मा. उच्च न्यायालयात याचिका क्र. ४३८/२०११ अन्वये नाईस शेल्टर यांच्या तक्रारीस अनुसरुन प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. सदर कामासाठी कोणतीही विशेष तरतूद न करता हे काम उद्यान कक्ष या विभागासाठी एकूण सामायिक आर्थिक तरतुदीतून करण्यात आली होती. सदर कामासाठी कंत्राटदारास दि. २९/१२/२०१६ रोजी कार्यादेश देण्यात आले व तद्नंतर प्रत्यक्ष जागेवर कामास सुरुवात करण्यात आली.

सदर उद्यान विकास कामात स्थापत्य कामे, यांत्रिकी व विद्युत कामे व हिरवळी लावणे इत्यादी स्वरुपाची कामे समाविष्ट आहेत. मा. न्यायालयाच्या आदेशानुसार सदर उद्यान हे पूर्ववत करण्याची प्रकिया हाती घेण्यात आली असताना स्थापत्य कामे जसे कि सुरक्षा भिंत व जाळी, प्रवेशद्वार इत्यादी आहेत तश्याच स्थितीत ठेवण्यात आली आहेत. सदर कामे हि एकूण भूखंडाच्या सुरक्षेच्या दुष्टीकोनातून देखील आवश्यक आहेत. सद्यस्थितीत केलेल्या कामापैकी केवळ विशेष मुलांना खेळण्यासाठी लावण्यात आलेली उपकरणे व्यवस्थितपणे काढून दुसऱ्या उद्यानात ठेवण्यात आली आहे. ही उपकरणे इतर कोणत्याही उद्यानात लावण्यात येऊ शकतात. सदर जागेवरुन केलेल्या कामापैकी काढण्यात आलेल्या खेळण्याच्या उपकरणाचा खर्च साधारण रुपये ३,६०,७५१.०० एवढे आहे.

(६) नाही. सदर प्रकरणी न्यायालयीन प्रकिया सुरु आहे.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेने उंच इमारतींच्या बांधकामांना दिलेली परवानगी**

**(२६) ११०८४० (१८-०४-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) अग्निशमन दलाकडे ५५ मीटर उंचीची शिडी उपलब्ध असून त्यापेक्षा जास्त उंचीच्या इमारतींना बांधकाम परवानगी दिली जात असल्याची तक्रार नगरविकास विभागाकडे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-११-२०१८) :** (१) होय. अशा प्रकारची तक्रार महानगरपालिकेस प्राप्त झाली असून कल्याण -डोंबिवली महानगरपालिकेमध्ये अनुज्ञेय उंचीपेक्षा जास्त उंचीचे बांधकाम करण्यात येत असल्याची तक्रार दिनांक ९/६/२०१७ रोजी शासनास सुध्दा प्राप्त झाली आहे.

(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीत प्रस्तावित उंचीबाबत इमारतीची एकंदर उंची ही अस्तित्वात असलेल्या अथवा प्रस्तावित रस्त्याची रुंदी अधिक इमारतीचे सामासिक अंतर यांच्या एकूण अंतराच्या दीडपट (१.५) एवढी असावी, अशी तरतूद आहे. तथापी विकसनाखालील प्लॉटचा आकार (Shape) व विकास योजना रस्ता वा आरक्षणामुळे प्लॉटचे चटईक्षेत्र पूर्ण क्षमतेने वापरता येत नाही. अशा रितीने निर्माण झालेली गैरसोय (Hardship) लक्षात घेता विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीच्या आधारे आयुक्तांना उंचीबाबत व सामासिक अंतराबाबत शिथीलता देण्याचे अधिकार आहेत.

अशा प्रकरणी अग्नीशमन अधिका-यांचे (Fire Officer) ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन ५५.०० मी. पेक्षा जास्त उंचीच्या बांधकामास महानगरपालिकेकडून परवानगी देण्यात येते. त्यामुळे प्रकरणी कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही. शासनास प्राप्त तक्रार अर्ज उचित कार्यवाहीसाठी महानगरपालिकेस पाठविण्यात आला आहे.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेने शहरासाठी जाहिर केलेल्या विकास आराखडयातील रस्त्यांमुळे सेन्च्युरी कंपनीतील एक प्लाण्ट आणि कर्मचाऱ्यांची वसाहत बाधित होत असल्याबाबत**

**(२७) १११४८० (०३-०४-२०१८). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेने शहरासाठी जाहिर केलेल्या विकास आराखडयातील रस्त्यांमुळे सेन्च्युरी कंपनीतील एक प्लाण्ट आणि कर्मचाऱ्यांची वसाहत बाधित होत असल्याने या कंपनीच्या कर्मचा-यांमार्फत महानगरपालिकेवर धडक मोर्चा माहे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या आठवडयात वा त्या दरम्यान काढण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी महानगरपालिका प्रशासनाने तोडगा काढण्यात येणार असल्याचे आश्वासित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानूसार कोणता निर्णय घेण्यात आला व त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१२-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) अशी वस्तुस्थिती दिसून येत नाही. उल्हासनगर शहराची सुधारीत प्रारुप विकास योजना दिनांक २१/४/२०१७ रोजीच्या अधिसुचनेन्वये शासनाने भागश: मंजूर केली आहे. सदर मंजूर विकास योजनेच्या प्रस्तावानुसार मे.सैंच्युरी रेयॉन कंपनीच्या मिळकतीमधून २४.०० मी. रुंदीचा विकास योजना रस्ता प्रस्तावित करण्यात आला आहे. सदरचा रस्ता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये वगळण्याची विनंती सैंच्युरी रेयान कंपनीने केली आहे. अर्जदार कंपनीचे अर्ज आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांचेकडे उचित कार्यवाहीकरीता पाठविण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रातील जमिनींचे हस्तांतरण करण्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क कमी करण्याबाबत**

**(२८) १११५७१ (२३-०४-२०१८). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील सवलतीच्या दराने उद्योजकांना दिलेल्या जमिनींचे इतर वापरासाठी हस्तांतरण करण्यासाठी आकारण्यात येणाऱ्या १०० टक्के शुल्कात कपात करून हे शुल्क २५ टक्के इतके आकारण्याचा निर्णय माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शुल्काच्या रकमेपैकी ६० टक्के रक्कम शासनाला तसेच ४० टक्के रक्कम औदयोगिक महामंडळाला देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हस्तांतरण शुल्कात १०० टक्क्यांवरून २५ टक्के इतकी कपात करण्याची कारणे काय आहेत, तसेच जमिनीचा वापर बंद करणार असल्याने होणार नफा लक्षात घेता या जमिनीच्या मूळ मालकांना लाभ देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१२-२०१८) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने औद्योगिक क्षेत्रासाठी जमिनीचे संपादन करुन औद्योगिक घटकांना भाडेपट्ट्याने दिलेल्या व कालांतराने अशा जमिनींना नागरी जमिन(कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ च्या कलम २० अन्वये सूट देण्यात आली आहे अशा जमीनी इतर औद्योगिक वापरासाठी हस्तांतरीत करावयाच्या झाल्यास अशा प्रकरणी शासन निर्णय दि.२३.११.२००७ मध्ये नमुद केल्यानुसार १००% ऐवजी यापुढे प्रचलित शिघ्रसिध्दगणकानुसार २५% हस्तांतरण शुल्क आकारण्याबाबतचा शासनाने दि.०३ फेब्रुवारी, २०१८ रोजी निर्णय घेतला आहे.

याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील औद्योगिक घटकांना भाडेपट्टयाने दिलेल्या व नाजकधा अधिनियम, १९७६ च्या कलम २० अन्वये औद्योगिक प्रयोजनार्थ सुट दिलेल्या अशा भूखंडावरील उद्योग मोठ्या प्रमाणावर बंद अवस्थेत असुन अशा उद्योग घटकाकडील जमिनीचे हस्तांतरण करण्यास व नविन उद्योजकांना या क्षेत्रामध्ये उद्योग उभारण्यास अडचण येत असल्याने याबाबतचे शुल्क कमी करण्याच्या कारणास्तव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सादर केलेल्या प्रस्तावावर उपरोक्त प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे रांजनोली (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील मुंबई- नाशिक हायवेवरील उड्डाणपुलाचे काम मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. कंपनीला दिल्याबाबत**

**(२९) ११२०३८ (१४-०४-२०१८). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे रांजनोली (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील मुंबई- नाशिक हायवेवरील उड्डाणपुलाच्या कामाचे एमएमआरडीएने मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांना दिनांक १० मे, २०१३ रोजी वा त्यासुमारास कार्यरंभ आदेश दिलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठेकेदाराने बाजूलाच असलेल्या टाटा हौसिंग कंपनीच्या खाजगी पूलाचे काम देखील घेतले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कंपनीला तीन वेळेस मुदतवाढ देऊन देखील उड्डाणपूलाचे काम केलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर या ठेकेदार कंपनीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-११-२०१८) :** (१) होय.
(२) टाटा हौसिंग पूलाचे काम हे खाजगी स्वरूपाचे असल्याचे दिसून येते.
(३), (४) व (५) मुंबई नाशिक हायवेवरील उड्डाणपुलाचे काम हे मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर (इं) लिमिटेड या कपंनीस देण्यात आले असून, कंत्राटदारास दिनांक १० मे, २०१३ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. सदर कामाच्या निविदेतील तरतूदीनुसार ३+३ मार्गिकांचे पूल व दोन्ही बाजूस ७ मीटर रुंदीचे सेवा रस्ते व स्लिप रस्ते यांचे बांधकाम करणे अंतर्भूत होते.

तथापि, सदर कामास परवानगी देताना भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाने ३+३ मार्गिकेऐवजी ४+४ मार्गिकांच्या उड्डाणपुलाचे बांधकाम करण्याचे निर्देश देण्यात आले. यास्तव रस्त्याच्या दोन्ही बाजूला ५ मी. रुंदीचे अतिरिक्त भूसंपादन करणे आवश्यक ठरले. तसेच या भागात असलेल्या बीपीसीएल इंधन वाहिनी, ठाणे मनपा जलवाहिनी, विद्युत वाहिन्या, इ. सेवा

वाहिन्या स्थलांतरीत/सुरक्षित करणे आवश्यक ठरले. सदर बाबींमुळे ठेकेदारास कामाकरीता जागा उपलब्ध करून देण्यास विलंब झाल्याने वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली.

सदरचे काम निर्धारीत मुदतवाढीत पूर्ण न झाल्याने ठेकेदारास दि. २२.०८.२०१७ व दि. ३०.०५.२०१८ रोजी प्राधिकरणामार्फत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. सदर उड्डाणपुलाचे काम आवश्यक गतीत पूर्ण होत नसल्यामुळे कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, काम लवकरात लवकर पुर्णत्वास नेण्यासाठी प्राधिकरणाच्या स्तरावर पाठपुरावा सुरू आहे.

रांजनोली येथील सर्व्हिस रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत. सदर उड्डाणपुलाच्या उजव्या बाजूच्या मार्गिकांचे काम माहे डिसेंबर, २०१८ मध्ये व डाव्या बाजूच्या मार्गिकांचे काम माहे मे, २०१९ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजित आहे.

---

## कुलाबा (मुंबई) येथील इमारतींची दुरवस्था झाल्याबाबत

**(३०) ११२३८५ (०३-०४-२०१८). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुलाबा (मुंबई) येथील हजारो इमारतींची दुरवस्था झाली असून या इमारतींमध्ये रहिवासी वास्तव्य करीत असल्याची बाब माहे जून, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुलाबा येथील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारती मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांच्या विकासासाठी सीआरझेड नियमावली व कायदा (कोस्टल झोन) यामुळे अडथळा निर्माण होत असल्याचेही माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यानच्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या धोकायदायक इमारतींचे सर्व्हेक्षण शासनामार्फत करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, या धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१९-११-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

कार्यकारी अभियंता/अ-विभाग, दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्या अखत्यारीत एकूण १०४३ उपकर प्राप्त इमारती येतात. सदर इमारतीपैकी बहुतांश इमारती ह्या ब्रिटिशकालीन बांधण्यात आल्या आहेत. सदर इमारतीचे सरासरी आयुष्यमान ८० ते १७० वर्षे झालेले असून सदर इमारती सद्यस्थितीत जीर्णवस्थेत असल्यामुळे त्यांचे आयुष्यमान संपलेले आहे. उक्त इमारतींमध्ये भाडेकरू/रहिवाशी वास्तव्य करीत आहेत. कुलाबा परिक्षेत्र विकासासाठी सीआरझेड नियमावली व कायद्यामुळे (कोस्टल झोन) विकासक या इमारतीच्या पुनर्विकासाकरिता पुढे येत नाहीत. त्यामुळे इमारतीचे पुनर्विकास/पुनर्बांधणी अडचणीचे ठरत आहे.

(३) होय, पावसाळा पूर्व सर्वेक्षण माहे फेब्रुवारी, २०१८ ते मे, २०१८ या कालावधीत करण्यात आले आहे.

(४) कुलाबा विभागात १४४ एम.जी. रोड, अ-११६३ ही इमारत धोकादायक म्हणून घोषित करण्यात आली आहे.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने त्यांच्या दि.१८.१०.२०१३ रोजीच्या पत्रान्वये सदर इमारतीच्या दुरुस्तीसाठी ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे. सदर इमारत अतिशय धोकादायक असल्याने इमारतीतील रहिवाशांना गाळे खाली करण्याच्या नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. परंतु या इमारतीतील रहिवाशांनी गाळे खाली न करता, मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे. मा. उच्च न्यायालयाने इमारत पडून जीवीत किंवा आर्थिक हानी झाल्यास त्यास म्हाडा जबाबदार राहणार नाही असे आदेश दि.०३.०५.२०१५ रोजी दिले आहेत. मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.१६१७/२०१५ अद्यापही प्रलंबित असून, न्यायालयाने इमारत निष्कासनास स्थगिती दिली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुर्तीजापूर (जि.अकोला) नगरपरिषदेंतर्गत गत २ वर्षात रमाई आवास योजनेतील कामे झाली नसल्याबाबत

**(३१) ११५०४४ (१२-०४-२०१८). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा नियोजन समितीची सभा दिनांक १३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सभेमध्ये मुर्तीजापूर नगरपरिषदेंतर्गत गत २ वर्षात रमाई आवास योजनेतील कामे झाली नसल्याने नगरपालिकेने कंत्राटदाराची रक्कम प्रलंबित ठेवली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रलंबित ठेवलेली रक्कम कंत्राटदारास अदा करण्यासाठी तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी हस्तक्षेप करून मुख्याधिकारी नगरपालिका यांना रक्कम देण्यास भाग पडल्याविषयी सदर सभेत चर्चा झाली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सभेतील चर्चेमध्ये जिल्हा नियोजन समितीने तत्कालीन जिल्हाधिकारी यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा ठराव पारित केला, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जिल्हा नियोजन समिती, अकोला यांनी सदर प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) • सदर सभेमध्ये मुर्तिजापूर नगरपरिषदे अंतर्गत रमाई आवास योजनेतील कामांबाबत चर्चा झाली नाही.

• नगरपरिषदेत रमाई आवास योजनेअंतर्गत झालेल्या बांधकामात कंत्राटदाराचा संबंध येत नसल्याने कंत्राटदाराचे कोणतेही देयक प्रलंबित नव्हते, असे मुख्याधिकारी, नगरपरिषद मुर्तिजापूर यांनी कळविले आहे.
• जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत झालेला ठराव हा केंद्र पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण व झोपटपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत झालेल्या कामांशी संबंधीत होता. रमाई आवास योजनेअंतर्गतच्या कामाशी त्याचा संबंध नव्हता. तसेच अद्याप जिल्हा नियोजन समितीने सदर प्रकरणी गुन्हा दाखल केलेला नाही, असे जिल्हाधिकारी, अकोला यांनी कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर महानगरपालिका (जि.ठाणे) विकास आराखड्यातही मुस्लीम कब्रस्तानाकरीता आरक्षित असलेल्या भूखंडाचे आरक्षण मे. रिजन्सी निर्माण या कंपनीचे विकासक यांचे नावे करण्यात येत असल्याबाबत**

**(३२) ११६५७३ (०३-०८-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) शहरातील दिनांक २६ मार्च, २०१३ रोजी सर्व्हे न. ५८ मधील २ एकर जागा मुस्लीम बांधवासाठी मुस्लीम कब्रस्तानसाठी आरक्षित करण्याचा निर्णय झाला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उल्हासनगर महानगरपालिकेने सदर जागा ताब्यात घेतल्यानंतर कब्रस्तानाला संरक्षण भिंत बांधण्यात आली व दफनविधी सुरु करुन दिनांक १९ जुलै, २०१७ रोजी उल्हासनगर महानगरपालिकाच्या ठराव क्र १९-ड अन्वये सर्व्हे न. ५८ मधील ८००० चौ मीटर इतकी जागा मुस्लीम कब्रस्तानकरीता आरक्षित करण्याचा ठराव करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उल्हासनगर महानगरपालिका विकास आराखड्यातही मुस्लीम कब्रस्तानाकरीता आरक्षित असलेल्या भूखंडाचे आरक्षण मे.रिजन्सी निर्माण या कंपनीचे विकासक श्री महेश अग्रवाल यांचे नावे करण्याचा प्रयत्न होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१८) :**(१) उल्हासनगर शहराच्या मुळ मंजूर विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करुन शासनाने मौ.म्हारळ येथील स.नं.५८(पै.) २ एकर जमीन कब्रस्तानकरीता आरक्षित केली आहे.

प्रारुप सुधारित विकास योजनेमध्ये सदरचे आरक्षण कायम ठेऊन उल्हासनगर महानगरपालिकेने सुधारित प्रारुप विकास योजना शासनास कलम ३० अन्वये मंजूरीकरिता सादर केली आहे. सदर प्रारुप सुधारित विकास योजनेस शासनाने भागश: मंजुरी दिलेली

असून, सदर भूखंड हा विकास योजनेमधून वगळलेल्या क्षेत्रामध्ये (E.P) विकास योजनेस मंजूरी दयावयाच्या क्षेत्रामध्ये समाविष्ट आहे.

(२) श्री.कलवंतसिंह सहोता व श्री.जमनादास पुरस्वामी या सदस्यांनी स्थगन प्रस्तावाद्वारे याबाबत महासभेत चर्चा होवून निर्णय घ्यावा, अशी विनंती केली असता, महासभेने दिनांक १९/७/२०१७ रोजी महासभा ठराव क्र.१९ ड अन्वये हा भूखंड दफनभूमीसाठी आरक्षित ठेवण्यास शासनास निदर्शनास आणून दयावे व न्यायालयाच्या आदेशास अधीन राहून मान्यता देत आहे, असा ठराव उल्हासनगर महानगरपालिकेने मंजूर केला आहे.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कपाडिया नगर ते मिठी नदीपासून वाकोला उड्डाणपुलापर्यंत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत उन्नत मार्गाचे काम सुरु असल्याबाबत**

**(३३) ११६७१२ (२३-०७-२०१८). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सांताक्रुझ-चेंबुर लिंक रोडअंतर्गत कपाडिया नगर ते मिठी नदीपासून वाकोला उड्डाणपुलापर्यंत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत उन्नत मार्गाचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उन्नत मार्गाच्या प्रकल्पामध्ये बाधित झालेली कपाडिया नगर ते मिठी नदीपासून ते सिएसटी रोडवरील अनिवासी बांधकामे महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उन्नत मार्ग प्रकल्पबाधितांची पात्र अपात्रते संदर्भातील अंतिम परिशिष्ट यादी अदयापपर्यंत निर्गमित झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उन्नत मार्ग प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असल्यामुळे प्रकल्पबाधित पात्रता धारकांसाठी पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याकरिता मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने पी.ए.पी अनिवासी गाळे महानगरपालिकेस उपलब्ध करुन दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकल्पामध्ये बाधित झालेल्या पात्र अनिवासी बांधकामधारकांना पर्यायी गाळे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-११-२०१८) :** (१) होय. कुर्ला ते वाकोला उन्नत मार्गाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत काम करण्यात येत आहे, तर कुर्ला ते वाकोला येथील रस्ता रुंदीकरणाचे काम हे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

(२) होय. मिठी नदीपासून ते सि.एस.टी. रोड वरील एकूण १४३ अनिवासी बांधकामे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आली आहेत.

(३) नाही, उन्नत मार्ग प्रकल्प बाधितांची पात्र अपात्रतेसंदर्भातील अंतिम परिशिष्ट यादी दिनांक १९.१.२०१८ रोजी निर्गमित करण्यात आली आहे व चौथी पुरवणी परिशिष्ट-२ दिनांक २७ जून, २०१८ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.
(४) होय. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस १२८ अनिवासी गाळे व ३० निवासी सदनिका हस्तांतरीत केल्या आहेत.
(५) प्रकल्पाने बाधित झालेल्या ५९ पात्र अनिवासी बांधकामधारकांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत बृहन्मुंबई महानगर पालिकेला हस्तांतरीत केलेल्या अनिवासी गाळयांचे वाटप करण्यात आलेले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३ प्रकल्पाबाबत**

**(३४) ११७२८७ (२६-०७-२०१८). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३ प्रकल्पाच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे,
(२) असल्यास, या प्रकल्पामुळे प्रकल्पबाधित होणाऱ्या गिरगांव आणि काळबादेवी परिसरातील इमारतीत राहणाऱ्या रहिवाश्यांचे पुनर्वसन त्याच परिसरात करण्यात यावे या रहिवाश्यांच्या मागणीच्या अनुषंगाने मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशनने म्हाडाच्या इमारतीतील घरे प्रकल्पबाधितांसाठी राखीव ठेवण्याबाबत म्हाडासोबतच्या कराराची प्रक्रिया पुर्ण झाली आहे काय,
(३) असल्यास, किती कालावधीत प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन करुन मेट्रो-३ चे काम पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१२-२०१८) :** (१) मेट्रो-३ प्रकल्पाची मेट्रो स्थानके व बोगद्याची २१% स्थापत्य कामे पूर्ण झाली असून सर्व ७ पॅकेजेसमधील कामे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि., मुंबई यांच्या स्तरावर प्रगतीपथावर आहेत.
(२) मेट्रो लाईन-३ प्रकल्पांतर्गत गिरगाव व काळबादेवी स्थानकामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन त्याच भागात मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि., मुंबई यांच्यामार्फत करण्यात येणार आहे. तात्पुरत्या स्थलांतरणाकरिता म्हाडामार्फत पिंपळवाडी (गिरगांव) येथे प्रकल्पबाधितांकरीता ८९ निवासी सदनिका मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. मुंबई यांना उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. सदर सदनिकांबाबत म्हाडा व मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांच्या दरम्यान करावयाच्या करारनाम्याची प्रक्रिया मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. च्या स्तरावर सुरु आहे.

(३) बाधित इमारतीच्या जागेचा ताबा मिळाल्यापासून ४६ महिन्याच्या कालावधीमध्ये मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांच्यामार्फत कायमस्वरुपी देय असलेल्या पुनर्वसनाकरितांच्या सदनिकांचे बांधकाम पूर्ण करुन देण्याचे नियोजित आहे.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये तब्बल ७८१ पदे रिक्त असल्याबाबत**

**(३५) ११७५६२ (२३-०७-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयकुमार गोरे (माण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.रणजीत कांबळे (देवळी), अ‍ॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका शाळांमध्ये तब्बल ७८१ पदे रिक्त असल्याचे माहिती अधिकाराअंतर्गत दिनांक ७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेने माहे सप्टेंबर,२०१७ पर्यंतची शिक्षकांची आकडेवारी दिली असुन त्यानुसार सर्व माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षण हक्क कायद्यानुसार ८९०० आवश्यक पदे आहेत मात्र सध्या महानगरपालिकेच्या सेवेत केवळ ८,११९ शिक्षक कार्यरत असुन अदयापही ७८१ पदे रिक्त आहेत अनेक शिक्षणशास्त्र पदवी व पदविकाधरक शिक्षक भरतीच्या प्रतीक्षेत असतानाही शिक्षकभरती न करता शिक्षक अतिरिक्त असल्याचे दाखविण्यात येत आहे ही गंभीर बाब असून शिक्षक भरती संदर्भात मुंबई महानगरपालिकेने प्रक्रिया सुरु करण्याची मागणी होत आहे हे लक्षात घेता शासनाने कोणती आवश्यक ती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१८) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत असलेल्या शाळांमधील पटसंख्येनुसार प्रशिक्षकांची ९६१९ पदे आवश्यक आहेत. तथापि, ९७२८ शिक्षक कार्यरत आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इंग्रजी माध्यमांच्या (इयत्ता १ ली ते १० वी) शाळांमध्ये ३१५ अतिरिक्त प्रशिक्षकांची व मुंबई पब्लिक स्कुल (इंग्रजी माध्यम) (इयत्ता छोटा शिशु ते १० वी) मध्ये ११३ प्रशिक्षकांची आवश्यकता आहे.

(२) व (३) मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत असलेल्या इंग्रजी माध्यम व मुंबई पब्लिक स्कूल (इंग्रजी माध्यम) मधील प्रशिक्षकांची रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

---

**ठाणे येथील घोडबंदर मार्गावर कासारवडवली, ओवळा आणी भाईंदर एकत्रित एकच उड्डाणपुल उभारण्याबाबत**

**(३६) ११८३७० (२९-०७-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील घोडबंदर मार्गावरील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी एममएआरडीएच्या माध्यमातुन उभारण्यात येणा-या कासारवडवली, ओवळा आणी भाईंदर या उड्डाणपुलांचा एकत्रित एकच उड्डाणपुल उभारण्याची लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास तसेच वारंवार मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी आतापर्यंत कोणती कार्यवाही केली व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) प्रश्नाधीन ठिकाणी घोडबंदर रोडच्या मध्यावर प्रस्तावित असलेल्या मेट्रो सोबत रस्त्यावरील वाहनांच्या वाहतूकीसाठी उड्डाणपुलाची अन्य काय उपाययोजना करता येईल, याबाबत सविस्तर अभ्यास करुन पुढील कार्यवाही करण्याचे प्राधिकरणाच्या स्तरावर नियोजित आहे.

---

**मुंबई महानगरपालिकेतील बायोमेट्रीक मशीन बंद असल्याने कर्मचा-यांच्या हजेरी नोंदणीत गोंधळ निर्माण झाला असल्याबाबत**

**(३७) ११८४०१ (२९-०७-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य),**

**श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयकुमार गोरे (माण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेतील बायोमेट्रीक मशीन बंद असल्याने कर्मचा-यांच्या हजेरी नोंदणी मध्ये गोंधळ निर्माण झाला असुन मशीनमधील त्रुटींमुळे महानगरपालिका कर्मचारी आणि अधिकारी यांचे वेतन कापण्यात येत असल्याचे दिनांक १८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मशीनमध्ये कर्मचारी व अधिकारी यांच्या तीन पाळयांची नोंदच घेण्यात आली नसल्याने अनेक कर्मचा-यांची गैरसोय होत आहे मशीन बंद असल्याने दैनंदिन हजेरीची नोंदणी करण्यास अडचण निर्माण झाली आहे हे लक्षात घेता आवश्यक ती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१८) :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व कार्यालयांत आधार क्रमांक आधारीत बायोमेट्रीक प्रणाली अंगिकारली असून, महानगरपालिकेमध्ये नोव्हेंबर २०१७ पासून बायोमेट्रीक प्रणालीतील उपस्थितीची जोडणी सॅप प्रणालीअंतर्गत मानव संसाधान प्रणालीशी करण्यात आली आहे.

सदर प्रणालीच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन संकलीत केले असता, बृहन्मुंबई महानगरपालिकेत कार्यरत कर्मचाऱ्याने कार्यालयात उशीरा उपस्थिती नोंदविल्यामुळे, कार्यालय लवकर सोडल्यामुळे अथवा मानव संसाधन प्रणालीत सदर कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय कार्यालयांद्वारे चुकीची/अपूर्ण माहिती भरल्यामुळे त्यांच्या वेतनात कपात करण्यात आली आहे.

तसेच, सदर बाबींची महानगरपालिकेच्या संबंधित खातेप्रमुखांमार्फत शहानिशा करण्यासापेक्ष थांबविण्यात आलेले मासिक वेतन कर्मचाऱ्यांना अदा करण्यात आले असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हयातील अग्निशमन दलातील रिक्त पदे भरुन अग्निशमन यंत्रणा सक्षम करण्याबाबत

**(३८) ११९३०० (२६-०७-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हास्तरावर अग्निशामक सक्षमीकरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा जिल्हयात व खामगांव तालुक्यात अग्निशमन दलातील फायरमनची ४० पदे रिक्त असल्याने अग्निशमन यंत्रणा आपत्कालीन प्रसंगी सक्षमपणे राबविले जात नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बुलढाणा जिल्हयात वाढते नागरिकीकरण व एम.आय.डी.सी. मुळे अग्निसुक्षिततेचा प्रश्न गंभीर झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बुलढाणा जिल्हयातील अग्निशमन दलातील रिक्त पदे भरुन अग्निशमन यंत्रणा सक्षम करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-११-२०१८) :** (१) राज्यातील जिल्हा स्तरावर सर्व महानगरपालिका / नगरपरिषदांमध्ये अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्यासाठी राज्यात महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान राबविण्यात येत असून त्या अंतर्गत सक्षमीकरणाशी संबंधित विविध बाबींची प्राधान्य क्रमानुसार अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(२), (३) व (४) • बुलढाणा जिल्ह्यातील ११ नगरपरिषदांमध्ये फायरमनची एकूण ३८ पदे रिक्त आहेत.
• ही पदे तात्काळ भरण्याबाबत जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी संबंधीत नगरपरिषदांना फेब्रुवारी, २०१८ मध्येच निदेश दिले आहेत.
• सदर कार्यवाही विहित कालावधीत पूर्ण होण्याच्या दृष्टीने योग्य ते उपाय योजण्यास नगरपरिषद प्रशासन संचालनालयास कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) शहरात होत असलेल्या अनधिकृत बांधकामांबाबत**

**(३९) ११९३२० (२८-०७-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) शहरात होत असलेल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई व्हावी व नवीन अनधिकृत बांधकामे होऊ नये म्हणून १५० हून जास्त ठिकाणी होत असलेल्या अनधिकृत बांधकामाविरोधात स्थानिक नागरिक श्री.निरंजन दास यांनी महानगरपालिकेत लेखी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारी करू नये व माहितीच्या अधिकारात कोणतीही माहिती मागू नये अन्यथा टाडा अंतर्गत फसविण्यात येईल अशी धमकी श्री.दास यांना उल्हासनगर महानगरपालिकेच्या अधिका-यांनी दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व नागरिकांना धमक्या देणा-या अधिका-यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) अशा प्रकारची धमकी उल्हासनगर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिल्याबाबतचा अर्ज महानगरपालिकेस प्राप्त झाला नसल्याचे तसेच, अशी धमकी प्राप्त झाल्याबाबतची माहिती संबंधित पोलीस स्टेशनकडून महानगरपालिकेस प्राप्त झाली नसल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिका हद्दीत राबविण्यात आलेल्या झोपडपट्टी पुनर्विकास योजनेबाबत**

**(४०) ११९६३४ (२३-०७-२०१८). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका हद्दीत क्लस्टर योजनेला मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे महानगरपालिका हद्दीतील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) असल्यास, सदर योजनेमध्ये आजपर्यंत किती प्रस्ताव तयार करण्यात आलेले आहेत व किती सदनिकांचे वाटप करण्यात आले आहे आणि किती सदनिका रिक्त आहेत,
(४) असल्यास, रिक्त असलेल्या सदनिकांबाबत कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१८) :** (१) ठाणे शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नागरी पुनर्निर्माण समुह विकास योजनेची नियमावली अधिसुचना क्र. टिपीएस-१२१३/ २७२६/प्र.क्र.२४/१४/नवि-१२, दि.५/७/२०१७ अन्वये समाविष्ट करण्यात आली आहे.
(२) ठाणे शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतची नियमावली अधिसुचना क्र. टिपीएस-१२१२/१२१/ प्र.क्र.६२/१३/नवि-१२, दि.११/९/२०१४ अन्वये समाविष्ट करण्यात आली आहे. तसेच शासन अधिसुचना दि.११/९/२०१४ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या क्षेत्रामध्ये ठाणे महानगरपालिकेचा समावेश करण्यात आला आहे.
(३) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये आतापर्यंत ६९ प्रस्तावांना इरादापत्र देण्यात आले असुन, ५१७७ सदनिका झोपडीधारकांना वाटप करण्यात आले आहेत.
(४) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत सदनिका रिक्त नाहीत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरात आयुर्वेदिक रुग्णालय सुरु करण्याबाबत

**(४१) ११९८१३ (२३-०७-२०१८). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात आयुर्वेदीक उपचार पध्दतीने उपचार करण्याकरिता महानगरपालिकेमार्फत आयुर्वेद रुग्णालय सुरु करण्याचा प्रस्ताव मागील आठ वर्षापासून आरोग्य लेखापालांच्या शेऱ्यामुळे रखडला असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील प्रत्येक प्रभागात एक या प्रमाणे २४ आयुर्वेदिक रुग्णालय सुरु करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी होण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१८) :** (१) मुंबई शहरात महापालिकेमार्फत आयुर्वेदिक रुग्णालय सुरु करण्याच्या प्रस्तावावर उप प्रमुख लेखापाल (आरोग्य) यांनी उपस्थित केलेल्या, रुग्णालयाच्या बांधकामाकरीता जागेची उपलब्धता, रुग्णालय चालविणार कर्मचारी वर्ग व अनुषंगीक सोयी-सुविधा इत्यादी मुद्दयांबाबतची पुर्तता होऊ न शकल्यामुळे प्रलंबित आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रभागांमध्ये २४ आयुर्वेदिक रुग्णालये सुरु करण्याचा अंतिम निर्णय घेण्यात आला नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) सद्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत बा.य.ल. नायर धर्मादाय रुग्णालय व रा. ए. स्मा. रुग्णालयामध्ये आयुर्वेदीक बाह्यरुग्ण विभाग व अनुक्रमे ५ व १० रुग्णशय्यांचा आंतररुग्ण विभाग कार्यरत असून, महानगरपालिका मुख्यालय, एलफिन्स्टन रोड, प्रभादेवी आणि अंधेरी या चार ठिकाणी आयुर्वेदीक दवाखाने चालविण्यात येतात.

तथापि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये आयुर्वेदीक रुग्णालय नव्याने सुरु करण्याची आवश्यकता तपासून याबाबतचा निर्णय महानगरपालिकेने त्यांच्या स्तरावर घ्यावा अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

---

## मुंबई शहरातील महानगरपालिका शाळांमधील स्वच्छता व सुरक्षेची जबाबदारी कंत्राटदारांवर सोपविण्यात आल्याबाबत

**(४२) ११९९१७ (२९-०७-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील महानगरपालिका शाळांमधील स्वच्छता व सुरक्षेची जबाबदारी कंत्राटदारांवर सोपविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कंत्राटदारांना त्यांचा कामाचा मोबदला देण्यापूर्वी महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांचे मत घेऊन उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांपैकी ७० टक्के विद्यार्थ्यांनी त्यांच्या शाळेत स्वच्छता चांगली असल्याचे मत दिले तरच कंत्राटदारांना त्यांच्या कामाचा मोबदला द्यावा असे आदेश महानगरपालिका आयुक्त यांनी दिल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आदेशानंतर त्याची अंमलबजावणी किती शाळांमध्ये करण्यात आली आहे, त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर आदेशाची अंमलबजावणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व शालेय इमारतींमधून करण्यात येत आहे.

तसेच, महानगरपालिकेच्या सर्व शालेय इमारतींमधून प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वच्छतेबाबत प्रतिसाद घेण्यात येत असून, हे प्रतिसाद ७५% जास्त असल्यास अधिदानाची प्रक्रिया करण्यात येत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईमध्ये नालेसफाईच्या कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याबाबत**

**(४३) १२०६९३ (२९-०७-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये नालेसफाईचे काम असमाधानकारक असून या कामामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचा आरोप एका राजकीय पक्षाने केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्याच्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नालेसफाईची कामे प्रत्यक्षात होत नसल्याचे आरोप नागरिकांकडून होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, तसेच चौकशीनुसार संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१८) :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सन २०१८ मध्ये महानगरपालिकेमार्फत मोठया नालेसफाईमध्ये आतापर्यंत ३ लाख मेट्रीक टनांहून अधिक गाळ काढून क्षेपणभूमीवर वाहून नेण्यात आला आहे.

तसेच, छोटे नाले, रस्त्यालगतची गटारे, पातमुखे, मोऱ्या, जलप्रवेशिका व लॅटरल्स यातूनही मोठया प्रमाणावर गाळ काढून क्षेपणभूमीवर वाहून नेण्यात आला आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या उपायुक्त यांनी रस्त्याच्या कामासाठी पैसे मागितल्याबाबत**

**(४४) १२१३०३ (२९-०७-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या उपायुक्त श्रीमती विजया कंठे यांनी रस्त्याच्या कामासाठी पैसे मागितल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनूसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मा. जिल्हा न्यायाधीश १ व अतिरिक्त सत्र न्यायालय, कल्याण यांनी, सदर प्रकरणी सी.आर.पी.सी. १५६(३) अन्वये पुढील कार्यवाही करणेसाठी ॲण्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांना आदेश पारित केले होते.

त्यानुसार सदर प्रकरणी दिनांक १५.०५.२०१८ रोजी मध्यवर्ती पोलीस स्टेशन येथे श्रीमती विजया कंठे यांचेविरुध्द गुन्हा रजि. ७३/२०१८, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७,१३,१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

**भिवंडी शहराच्या प्रवेशद्वारावर एमएमआरडीएअंतर्गत दोन मार्गी उड्डाणपूलाच्या कामाबाबत**

**(४५) १२१८७० (२५-०७-२०१८). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहरात माणकोली गावाच्या बाजूने कोंडी टाळण्यासाठी शहराच्या प्रवेशद्वारावर एमएमआरडीए अंतर्गत दोन मार्गी उड्डाणपूलाचे काम हाती घेण्यात आले आहे मात्र एका मार्गाचे काम पूर्ण झाले असून दुसरा मार्ग अद्यापही सुरु न झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मार्गीचे खांब व त्यावरील तुळ्या (गर्डर) टाकण्याचे काम संथ गतीने सुरु असून या मार्गावर येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी आश्वासन देऊनसुद्धा सदर कामाला विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन स्तरावर कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-११-२०१८) :** (१) होय.
(२) माणकोली येथील उड्डाणपुलाच्या उजव्या मार्गिकांचे काम पूर्ण करण्यात येऊन त्यावरुन दिनांक ०८.०४.२०१७ रोजी दोन्ही दिशेकडील वाहतूक चालू करण्यात आलेली आहे. सदर उड्डाणपुलाच्या डाव्या बाजूच्या मार्गिकेचे काम दिनांक ०१.१२.२०१८ पर्यंत पूर्ण होणे नियोजित आहे.
(३), (४) व (५) सदर पुलाच्या कंत्राटदारावर प्राधिकरणामार्फत दंडात्मक कार्यवाही करण्यात आली असून, सदर काम पूर्णत्वास नेण्यासाठी प्राधिकरणाच्या स्तरावर पाठपुरावा सुरु आहे.

---

### मुंबईच्या कमला मिल कंपाऊंडमधील हॉटेलला लागलेल्या आगीबाबत

**(४६) १२१९४४ (२५-०७-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईच्या कमला मिल कंपाऊंडमधील हॉटेलला आग लागून १४ निष्पाप नागरीकांचा मृत्यु झाल्याची घटना दिनांक २८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मध्यरात्री घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवैध बांधकामे आग नियंत्रक उपकरणांचा अभाव, अवैध पार्कींग यामुळे सदर घटना घडली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या घटनेची चौकशी करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१८) :** (१) लोअर परळ येथील कमला मिल कंपाऊंडमधील 'वन अबव्ह' आणि 'मोजोस ब्रिस्टो' या दोन रेस्टोपबमध्ये दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी लागलेल्या भीषण आगीत १४ जणांचा मृत्यु झाला असून, ५४ जण जखमी झाले आहेत व अग्निशमन दलाचा १ जवान जखमी झाला आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने सदर आगीच्या दुर्घटनेची चौकशी केली असता, सदर आग "आगीचे उडते निखारे जळाऊ कापडाशी संपर्कात आल्यामुळे" व सदर आगीची सुरुवात ही "मोजोस बिस्ट्रो" रेस्टॉरंटमध्ये झाली असल्याचे निष्पन्न झाले.

(३) सदर दुर्घटनेच्या अनुषंगाने आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी केलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये दोन सहाय्यक आयुक्तांच्या कामकाजातील निदर्शनास आलेल्या पर्यवेक्षीय त्रुटी तसेच परवानापत्र जारी करण्यामध्ये झालेल्या अनियमितता पडताळण्याच्या दृष्टीने त्यांच्याविरुध्द खात्यांतर्गत सर्वंकष चौकशी करण्यात येत आहे.

(४) व (५) सदर दुर्घटनेशी संबंधित मुंबई अग्निशमन दलाचे सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी यांना महानगरपालिकेच्या सेवेतून निलंबित करण्यात आले असून, एक केंद्र अधिकारी यांना ना.म. जोशी मार्ग पोलीस ठाण्यामार्फत दिनांक २०.०१.२०१८ रोजी अटक झाल्यानंतर निलंबित करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी ना. म. जोशी मार्ग पोलीस ठोणे येथे गु.र.क्र. २९१/२०१८ कलम ३०४, ३३७, ३३८, २१६, २८५, १९७, १९८, ४७१, ४६६, ४६७, ३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी प्राथमिक चौकशी करुन अहवाल शासनास सादर केला आहे.

सदर चौकशी अहवालामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध खात्यांत कार्यरत असलेल्या एकूण १२ अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द खात्यांतर्गत सर्वंकष चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले असून, खात्यांतर्गत चौकशीची कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर प्रकरणी अन्य कर्मचाऱ्यांचा सहभाग निश्चित करण्याच्या दृष्टीने पुढील तपास सुरु आहे.

---

## मुंबई येथील नायर हॉस्पिटल येथे एमआरआय यंत्रात सापडून तरुणाचा मृत्यू झाल्याबाबत

**(४७) १२१९५७ (२५-०७-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील नायर हॉस्पिटल येथे एमआरआय यंत्रात सापडून तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक २८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने चौकशीत निष्पन्न झालेल्या माहितीच्या आधारे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१८) :** (१) दिनांक २७ जानेवारी, २०१८ रोजी नायर रुग्णालयातील एम.आर.आय. विभागात झालेल्या दुर्घटनेत रुग्णासमवेत असलेले श्री. राजेश मारु यांचा वायु शरीरात गेल्याने मृत्यु झाला ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर प्रकरणी रुग्णांच्या नातेवाईकांनी आग्रीपाडा पोलीस स्टेशन येथे नोंदविलेल्या प्रथम खबरी अहवालाच्या अनुषंगाने गु.र. क्रमांक २४/२०१८ दाखल करण्यात आला असून, पोलीसांमार्फत तपास करण्यात येत आहे.

तसेच सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत स्वतंत्र चौकशी करण्यात येत आहे.

सदर प्रकरणी रुग्णालयाचे २ डॉक्टर्स, १ वॉर्डबॉय, १ आयाबाई यांना अटक करण्यात आली असून, त्यांची जामिनावर मुक्तता करण्यात आली आहे. रुग्णाच्या नातेवाईकांनी आग्रीपाडा पोलीस स्टेशन येथे नोंदविलेल्या प्रथम खबरी अहवालाच्या अनुषंगाने गु. र. क्रमांक २४/२०१८ दाखल करण्यात आला असून, पोलीसांमार्फत तपास करण्यात येत आहे.

तसेच सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत स्वतंत्र चौकशी करण्यात येत आहे.

नायर रुग्णालयाच्या एम.आर.आय. विभागात घ्यावयाची काळजी व एम.आर.आय. सेफ्टीसाठी SOP- (Standard Operating Procedure) रुग्णांकरीता उपलब्ध आहेत. तसेच, एम. आर. आय. च्या कन्सेंट फॉर्मवर रुग्णांकरीता घ्यावयाची काळजी व रुग्णांसाठी निषिध्द असलेल्या साधनांची माहिती दिलेली आहे.

नायर रुग्णालयात अशा दुर्घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता एम.आर.आय. विभाग प्रमुखांनी सुचविलेल्या खालील उपाययोजना करण्याचे प्रस्तावित आहे :-

१. एम.आर.आय. विभागात रुग्णासमवेत असलेल्या नातेवाईकांना प्रवेशास मज्जाव/प्रतिबंध करण्याकरीता एम.आर.आय. विभागाच्या प्रवेशव्दाराच्या बाहेरील बाजूस तिन्ही सत्रांत एक सुरक्षारक्षक कायमस्वरुपी तैनात करण्यात येईल.

२. एम.आर.आय. विभागात रुग्णाची एम.आर.आय. तपासणी करतांना आवश्यक स्पेशालिटी मेडिकल ऑफिसर, निवासी वैद्यकीय अधिकारी, तंत्रज्ञ, परिचारिका, वॉर्डबॉय, आयाबाई आणि सुरक्षारक्षक इत्यादी कर्मचारीवर्ग कायमस्वरुपी उपस्थित असणे अत्यंत आवश्यक आहे.

३. एम.आर.आय. विभागात सध्या केवळ १ प्राध्यापक (विभागप्रमुख) व १ सहाय्यक प्राध्यापक अशी दोन पदे कार्यरत असून एम.आर.आय विभागाकरीता सदर दोन पदांव्यतिरिक्त १ सहयोगी प्राध्यापक व १ सहाय्यक प्राध्यापक अशी दोन पदे निर्माण करण्यात यावी व ती कायमस्वरुपी भरण्यात यावी.

४. नायर रुग्णालयातील एम.आय.सी.यु., एस.आय.सी.यु., आय.सी.सी.यु., एन.आय.सी.यु., आय.पी.सी.यु., ट्रॉमा या प्रत्येक अतिदक्षता विभागांकरीता स्वतंत्ररित्या एम.आर.आय. कॉम्पिटेबल ट्रॉली, एम.आर.आय. कॉम्पिटेबल व्हिलचेअर, ऑक्सिजन सिलेंडर, फायर एक्स्टिंग्युशर (Fire Extinguisher) उपलब्ध करुन देणे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोरिवली (मुंबई) परिसरातील दौलतनगर रोड क्र.३ जवळील जलवाहिनीतून दूषित पाणीपुरठा होत असल्याबाबत**

**(४८) १२२१६८ (२९-०७-२०१८). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बोरिवली परिसरातील दौलतनगर रोड क्र.३ जैन मंदिर जवळ जलवाहिनीतून दूषित पाणीपुरठा होत असल्याची तक्रार नागरिकांनी महानगरपालिकेकडे केली असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दूषित पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करून जलवाहिनीची तातडीने दुरुस्ती करून शुद्ध पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्राथमिक उपाययोजना म्हणून सदर परिसरातील हायड्रंटद्वारे दुषित पाणी बाहेर काढून पाणी पिण्यायोग्य असल्याची खात्री केल्यानंतर सदर ठिकाणी पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(३) सदर परिसरातील दुषित पाण्याची गळती शोधण्यासाठी भूमिगत जलवाहिन्यांचे गळती अन्वेषण, जलवाहिन्यांचे जाळे तपासणे व सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्याद्वारे जलवाहिन्यांचे अंतर्गत निरीक्षण करणे इत्यादी कामे महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहेत.

गळत्यांची दुरुस्ती महानगरपालिकेमार्फत तातडीने करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे राजनोली (ता.भिवंडी) येथील इकोहोम्स टाऊनशिप, टाटा निमंत्रण या प्रकल्पाबाबत**

**(४९) १२२६६९ (२९-०७-२०१८). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे राजनोली (ता.भिवंडी) येथील इकोहोम्स टाऊनशिप, टाटा निमंत्रण या प्रकल्पासाठी कुठल्याही प्रकारची परवानगी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत देण्यात आली नसल्याची माहिती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी माहितीच्या अधिकारात दिनांक ११ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असतांनाही या भागात ५ ते ६ टॉवर उभारण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू भागात झालेले अनधिकृत बांधकाम तातडीने निष्कासित करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे तसेच या सर्व अनधिकृत बांधकामांना पाठिंबा देणा-या शासकीय अधिकारी व सदर विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१२-२०१८) :** (१) व (२) दिनांक ११ मार्च, २०१५ रोजीच्या माहिती अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत दिलेले उत्तर हे मौ.रांजनोली, ता.भिवंडी येथील टाटा हौसिंग या प्रकल्पाच्या मुख्य रस्त्याच्या मंजूरीबाबत असून सदर उत्तर टाटा हौसिंग प्रकल्पामधील इमारतीच्या बांधकामासंदर्भात नाही.

मौजे रांजनोली, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील स.क्र.३२,३४,३५, ३६,३७,४९/ १ ते ९, ५०, ५१, ५२/२,४/२, ५३/१अ, ८, १६, १८ या जमिनीवर मे.इको होम्स टाऊनशिप प्रा.लि./ मे.टाटा हौसिंग डेव्हलपमेंट कंपनी प्रा.लि. यांना भाडेतत्वावरील घरे योजना प्रकल्पास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक २१/५/२००९ रोजी लोकेशनल क्लिअरन्स दिले आहे. तदनंतर दिनांक १९/३/२०१० रोजी प्राधिकरणाने बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र प्रदान केले आहे. तद्नंतर प्राधिकरणाने दिनांक ११/७/२०१३ रोजी सुधारीत लोकेशनल क्लिअरन्स प्रदान केले आहे व त्याअनुषंगाने दिनांक २६/११/२०१३ रोजी सुधारीत बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुदखेड (जि.नांदेड) येथील सुभाष गंज मोंढा मार्केट मधील शासकीय जागेवरील अनधिकृत अतिक्रमणे हटविण्याबाबत

**(५०) १३४५१९ (०५-१२-२०१८). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुदखेड (जि.नांदेड) येथील सुभाष गंज मोंढा मार्केट मधील शासकीय जागेवरील अनधिकृत अतिक्रमणे मा. मुख्यमंत्री यांच्या आदेशानंतर दिनांक ९ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास हटविल्यानंतर पुन्हा त्याच जागेवर संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने अतिक्रमण करण्यात आल्याची तक्रार श्री. नामदेव पवीतवार यांनी दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, नांदेड, मुख्याधिकारी, मुदखेड नगरपालिका यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अतिक्रमण हटविल्यानंतर लगेच पुन्हा त्याच जागेवर अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तींविरोधात कोणती कारवाई करण्यात आली आहे व अतिक्रमणास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५१३ (४४)

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी अतिक्रमण धारकाने पुन्हा केलेले अतिक्रमण निष्कासित करण्याच्या कार्यवाहीस मा.दिवाणी न्यायालय, नांदेड येथे दावा दाखल केला आहे.

- मा.न्यायालयाने "जैसे थे" परिस्थिती ठेवण्यात यावी, असे आदेश पारित केले आहेत.
- मा.न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित असल्याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांनी अहवाल सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.